# माणूस

शनिवार
१८ ऑगस्ट ७९
७५ पैसे


## एक शोध मुलाखत

पृष्ठ नऊ...





# सप्रेम नमस्कार....



□ मी आपल्या साप्ताहिकाचा नियमित वाचक असून आपण प्रकाशित करीत असलेल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आदी समालोचनांचा जनमानसावर निश्चितच पगडा बसत असतो. त्या दृष्टीने आपले कार्य उल्लेखनीय आहे. आपण जोपासत असलेली ' पत्रकारिता ' खऱ्या अर्थाने झुंझार व निर्भिड अशी आहे.

' झंझावातानंतर चक्रावून गेलेली दिल्ली ' हे खास वार्तापत्र तर ह्याचा मूर्तिमंत दाखलाच होय ! श्री. मंदार फडके ह्या पत्रपंडितांचे खास अभिनंदन !

९ ऑगस्ट ७९ — **विजयकुमार मोडक, पुणे**

□ ' कुरुक्षेत्र केरळ ' ही हर्डीकर–कामत यांची लेखमाला फारच सुंदर आहे. या लेखकद्वयांनी विश्लेषण निःपक्षपातीपणाने केलेले आहे, याची निश्चितच खात्री पडते. संघ-विरोधकांनी या लेखांचे काळजीपूर्वक वाचन केल्यास त्यांना आपली संघाबद्दलची पूर्वग्रहदूषित वृत्ती सोडावीच लागेल असा विश्वास वाटतो.

ही लेखमाला संपल्यावर ते सर्व लेख पुस्तकरूपाने लवकर प्रसिद्ध करावेत ही विनंती.

३ ऑगस्ट ७९ — **शरद जोशी, डोंबिवली**

## किस्सा कुर्सीका

बुद्धिबळाच्या डावात एकदा, जोरात झाले भांडण
चौसष्ट घरांचे बनले रक्तबंबाळ रणांगण–
उंटच आधी चिडला, ' मी असेना का तिरळा !
वजीराची चाल मिळताच होईन की हो सरळा ! '
दिडका घोडाही उठला, ' मला तुम्हीच केलात लंगडा,
वजीराची वस्त्रे मिळताच निश्चित होईन खडा '
हत्ती देई धडक, ' पुन्हा म्हणाल का जाडा ?
वजीर मला म्हणा; नाही तर, डावच मोडा '
प्याद्यांनाही बळ आले, ' ठीक ! डाव म्हणा तुमचा,
पण वजीर कराल तर, आधार देऊ आमचा '
वजीर आला काकुळतीला, ' डाव असला कसा !
अरे, वजीर ना मी स्वयंभू ! चाल बदलू कसा ?
तुम्हीच दुहेरी सदस्य, मी एकटाच ब्रह्मचारी.
एकेरी माझी निष्ठा, ना गोतावळा भ्रष्टाचारी '
सर्वांच्या कोलांट उड्यात राजाला लागला धक्का,
' सोडले पहा सिंहासन, निर्णय माझाच पक्का '

२६ जुलै ७९ — **म. मु. शिखरे, सांगली**


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : बारावा
१८ ऑगस्ट १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

मुक्काम पुणे

# हा विचार पसरला पाहिजे

प्रतिनिधी

मोरारजी–मंत्रिमंडळाला खाली खेचून चरणसिगांचं संधिसाधू सरकार सत्तेवर आलं आणि संबंध देशात संतापाची लाट उसळली. नीती आणि विवेक या दोन गोष्टींबद्दल ज्यांना अजूनही आदर आहे, माणसाच्या विचारात आणि वर्तनात त्या असल्या पाहिजेत असं ज्यांना वाटतं अशी माणसं एकत्र येऊ लागली. चरणसिंग सरकारचा निषेध करू लागली.

आणीबाणीप्रमाणेच याही वेळी महाराष्ट्रात आपली बुलंद तोफ डागण्याचा मान दुर्गाबाई भागवतांनी मिळवला. वयाची सत्तरी गाठलेली ही विचारवंत विदुषी मुंबईमध्ये कोपऱ्याकोपऱ्यावर सभा घेऊ लागली. अहंकाराचा लवलेशही न बाळगता केवळ एखाद्या खुर्चीवर ती उभी राहून रेल्वे स्टशनाबाहेर फुटीरांच्या निषेधात्मक भाषणं करू लागली आणि घड्याळाच्या काट्याबरोबर धावणारा मुंबईचा माणूसही थबकू लागला. दहा-पंधरा मिनिटात पाच-सहा हजारांची गर्दी जमू लागली. कारण Often thought, but netver so well-expressed, असंच दुर्गाबाईंच्या भाषणांचं स्वरूप होतं.

□

३१ जुलैला दुर्गाबाई पुण्यात आल्या. त्याच दिवशी संध्याकाळी गोखले हॉलमध्ये त्यांचं जाहीर भाषण आयोजित करण्यात आलं होतं. अध्यक्षस्थानी प्रा. देवदत्त दाभोलकर होते. भाषणाची वेळ साडेसहा होती; पण सव्वासहापर्यंत हॉल संपूर्ण भरून गेला होता. दुर्गाबाई वेळेवर आल्या. सभेला सुरुवात झाली. दुर्गाबाईंच्या आधी तालीम खंबाटा बोलले. जनता पक्षाचे पुणे शहराचे हे चिटणीस. अतिशय सुंदर हिंदीमध्ये त्यांनी आपली व्यथा मांडली. हिंदी भाषेचं मार्दव, आर्जव, भावनाप्रधानता सर्वांचाच खंबाटांनी सुंदर उपयोग करून दुर्गाबाईंच्या भाषणासाठी श्रोत्यांची मनं तयार केली.

दुर्गाबाई उभ्या राहिल्या. टाळ्यांचा जोरदार कडकडाट झाला. हळूहळू आवाज तापू लागला; सभा तापू लागली. गोखले हॉलचं आवार भरून गेलं होतं. लक्ष्मीरोड वाहतुकीला बंद झाला होता. ताराबाई लिमयेंच्या दवाखान्यापुढील फूटपाथवरही श्रोते उभे राहिले होते. घणासारखे शब्द येत होते. संधिसाधू राजकारण्यांचे बुरखे फाडत होते. खरं स्वरूप उघडं करीत होते. श्रोत्यांच्या भावनांशी एकरूप होऊन जात होते. इंदिरा गांधींविषयी दुर्गाबाई त्वेषाने बोलू लागल्यावर एक स्त्री उभी राहिली. 'इंदिराजींचं प्रगतीचं दशक तुम्ही विसरू शकणार नाही...' असं काहीसं ती ओरडली. श्रोते भारावून गेले होते. हॉलच्या बाल्कनीतून 'इंदिरा मुर्दाबाद'च्या घोषणा आल्या. त्या स्त्रीला कोणी तरी बाजूला घेऊन गेलं. सभेचं वातावरण थोडं डिस्टर्ब झालं; पण ही स्त्री जरा विक्षिप्तच आहे. ती स्वतःला इंदिरा काँग्रेसची कार्यकर्ती म्हणवते; पण पुण्यातील इंदिरा काँग्रेसचे लोक तिची सदैव टिंगल करत असतात. कॉर्पोरेशनच्या शिक्षण–समितीच्या सदस्यत्वासाठी तिने अर्ज भरला तेव्हा त्यावर अनुमोदनाची सही द्यायलासुद्धा कोणी तयार होत नव्हतं. नुकतीच महापौरपदाची निवडणूक झाली तेव्हा प्रेक्षकांच्या गॅलरीत बसूनही हिने काही तरी गोंधळ घातला होता. शेवटी सभागृहातील एकमेव महिला–सदस्या मालतीबाई परांजपे प्रेक्षकांच्या गॅलरीत गेल्या व त्यांनी ते प्रकरण मिटवलं. हे सगळं थोडं विस्ताराने सांगायचं कारण एवढंच की, त्या दिवशीची दुर्गाबाईंची सभा उधळण्याचा कोणाचा डाव नव्हता. अर्थात असता तरी तो सफलही झाला नसता. केवळ या स्त्रीला स्वतःचं नाव काही ना काही प्रकारे वर्तमानपत्रात यावं असं वाटत असावं. कारण या सभेनंतर एक–दोन पत्रकारांना भेटून तिने असं बोलून दाखवलं की, 'त्या दिवशी मी एवढा निषेध केला तरी कोणी काही छापलं नाही.'

दुर्गाबाईंनी आपल्या भाषणात असं सांगितलं की, आपण आता आपल्या पोटातली आग विझू द्यायची नाही; पण डोकं मात्र अगदी थंड ठेवून पुढली कृती करायची. हे अतिशय महत्त्वाचं होतं; पण दुर्दैवाने स्वतः दुर्गाबाईच ते साधण्यात थोड्या अयशस्वी झाल्या होत्या. अन्यथा, 'शांता नाईक यांना घेऱ्या येण्याची सवय आहे. आता त्यांना रस्त्यात घेरी आली तरी कोणी पाणी पाजू नका!' असा क्षुद्र सल्ला त्यांनी दिला नसता; पण त्यांचा असा तोल जाणंही समजण्यासारखं होतं. कोणताही स्वार्थ नसताना राजकारणातली फक्त झळ या साध्वीने गेली चार-पाच वर्षं सोसली आहे.

सभेच्या शेवटी आभार मानताना लोकशाही दक्षता समितीचे श्री. के. डी. जोशी यांनी समितीला पाठिंब्याबरोबरच आर्थिक सहाय्य करण्याचे आवाहन उपस्थितांना केले आणि सभेनंतर स्टेजवर पैसे देणाऱ्यांची लहानशी रांगच लागली. कुणी एक रुपया देत होता, कुणी दोन, कुणी पाच. महत्त्व आकड्याला नव्हतं. कुठल्या तरी मूल्यासाठी या देशातला सामान्य मध्यमवर्गीय आपल्या खिशाला खोट लावून घेत होता, हे दृश्य अधिक महत्त्वाचं होतं.

सभेचे अध्यक्ष म्हणून बोलताना प्रा. दाभोलकरांनी व्यक्त केलेले विचार प्रगल्भ लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. दोन वर्षांपूर्वी पुण्यातील साहित्य संमेलनात जेव्हा दलित मंडळींनी गोंधळ उडवून दिला होता तेव्हा, 'तुमचे विचार आणि मतं माझ्याविरुद्ध असली तरी ती तुम्हाला मांडता यावीत म्हणून मी लढेन,' हे वाक्य सांगत त्या वेळी दाभोलकरांनी गोंधळ शमवायचा प्रयत्न केला होता. याही वेळी ह्याच विचार त्यांनी थोडा निराळ्या प्रकारे सांगितला. इंदिरा काँग्रेसच्या कार्यकर्तीला लोकांनी आरडाओरडा करून गप्प बसवल्याबद्दलही प्रा. दाभोलकरांनी खेद व्यक्त केला व प्रत्येकाला आपले विचार मांडण्याची संधी दिली जावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रा. दाभोळकरांचे हे विचार निश्चितच मननीय आहेत. लोकशाही मूल्यांची खरोखरच कास धरणाऱ्या प्रत्येकाने ते आपल्या कृतीत आणले पाहिजेत. पण दुर्गाबाईंच्या भाषणामुळे सभेचा मूड अगदी निराळा

झाला होता. त्यामुळे त्यांच्या भाषणानंतर प्रा. दाभोळकरांचे हे विचार तापलेल्या तव्यावर पडलेलं पाणी जसं क्षणात नाहीसं होतं तसे जनमानसावर ठसलेच नाहीत. काहींनी तर अध्यक्षांनी सभेचा टेंपोच घालवून टाकला, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. काही क्षण असे असतात की जनसमदाय एक विशिष्ट विचार सोडता इतर काही ऐकायच्या मनस्थितीतच नसतो. ते क्षण असेच होते. लोक चिडले होते, भारावून गेले होते, काही करता तर येत नव्हतं आणि म्हणून जास्तच संतापले होते.

◻

दुसऱ्या दिवशी म्हणजे १ ऑगस्टला दुर्गाबाईंचं एस. पी. कॉलेजमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त भाषण झालं. त्याच दिवशी एका स्थानिक वर्तमानपत्रामध्ये मृणाल गोरेंची मुलाखत प्रसिद्ध झाली होती. त्यामुळे तर दुर्गाबाईंना अधिकच चेव चढला. श्रोत्यांनाही ते आवडत होतं. जे आपल्याला बोलता किंवा करता येत नसतं; पण तशी इच्छा तर असते, ते दुसरं कोणी तरी बोलतकरत असल्याचं पाहूनही एक समाधान मिळतं, आनंद मिळतो. तेच दुर्गाबाईंच्या या दोन सभांमध्ये अनुभवाला आलं होतं. त्या भरात दुर्गाबाईंचा आक्रस्ताळेपणा, काही क्षुद्र उल्लेख श्रोत्यांनी खपवून घेतले. काहींनी तर ते गुणच असल्याचा दावा केला. दुर्गाबाईंच्या आणखीही दोन-तीन सभा झाल्या. त्या जिथे जातील तिथे गर्दी खेचत होत्या. जमलेल्यांना प्रभावित करत होत्या. पुन्हा एकदा महाराष्ट्रातला मराठी माणूस ढवळून काढायचा चंगच या बाईने बांधला होता. 'फुटिरांचे राजीनामे घ्या आणि त्यांना पुन्हा मतं देऊ नका' हा मंत्र घरोघर पोचवायचा प्रयत्न ती स्वतः करत होती, इतरांना करायला सांगत होती.

◻

५ ऑगस्टला संध्याकाळी मोहन धारिया आपली बाजू पुण्यातील मतदारांसमोर मांडणार होते. तत्पूर्वी सकाळी महाराष्ट्रातील जनता पक्षाचे चिटणीस पन्नालाल सुराणा यांनी 'पूनम'वर पत्रकार परिषद बोलावली. दुपारी चार वाजता पुण्यातूनच निवडून गेलेल्या शांती नाईक पुण्यातील 'जनता' (एस) ची सावतामाळी भुवनमध्ये स्थापना करणार होत्या. दिवस फारच गडबडीचा होता. पन्नालाल सुराणांनी पत्रकार परिषदेमध्ये संघावर टीका करणारं पत्रक वाटलं. वर असंही सांगितलं की, 'हे मी 'जनता पक्षाचा चिटणीस' म्हणून प्रसिद्धीला देत नसून 'पन्नालाल सुराणा' म्हणून देत आहे.' पत्रकारांचा इंटरेस्टच संपला. कारण सुराणांची 'व्यक्ती' म्हणून काय मतं आहेत हे सर्वांना पूर्ण माहितच होतं. १९७७ साली जनता पक्षाच्या पुण्यातील विजय सभेच्या वेळी पुलंच्या टेपला श्रोत्यांनी जी ट्रीटमेंट दिली तीच सुराणांच्या या पत्रकाला त्यामुळे मिळाली.

संध्याकाळी गोखले हॉलमध्ये धारिया काय बोलतात याबद्दल सामान्य नागरिकांना फारच कुतुहल होतं. पुन्हा एकदा गोखले हॉल आणि लक्ष्मी रोड फुलून गेला. दरम्यान दुपारी साडेतीन वाजता धारियांनी स्वतःच्या एस.पी. कॉलेज जवळील घरीच एक पत्रकार परिषद बोलावून संध्याकाळच्या भाषणाचं स्वरूप स्पष्ट केलं होतं. संध्याकाळी धारियांनी सर्वांना धोपटलं आणि तरीही जनता पक्षातच राहून लढा देणार, सत्ता येते आणि जाते, मला तुमचं प्रेम हवं अशी टाळ्यांची वाक्यंही टाकली. धारिया पक्षातून बाहेर पडणार नाहीत, याचंच एकूण राजकीय परिस्थितीमुळे हबकून गेलेल्या सामान्य माणसाला हायसं वाटलं होतं. पण त्याहून एक डोकेबाज कॉमेंट म्हणजे–'धारियांनी अजूनही सर्व पर्याय ओपन ठेवले आहेत.'

त्या दिवशी सभा संपल्यावर धारिया ॲम्बॅसॅडरमधून परत चालले होते. गाडीत ड्रायव्हर आणि त्याच्या शेजारी एक मनुष्य बसला होता. मागल्या सीटवर धारिया. एकटेच. रस्त्याकडे बघत. फार विचित्र वाटलं.

◻

सावता माळी भुवनमधली शांती नाईकांची सभा मात्र अगदीच फ्लॉप गेली. हॉल भरला होता. बरीच माणसं मुख्य दरवाजापासून हॉलपर्यंत कुठेही रेंगाळत होती. तंबाकू चोळत होती. गप्पा मारत उभी होती. थोडक्यात, त्यांचं भाडोत्रीपण लपत नव्हतं. बाहेर फौज फाटा मात्र जबरदस्त होता. बहुधा त्याच्याच जोरावर नाईकबाईंनी, 'मला कोणीही रोखू शकणार नाही' असा वुभुत्कार केला असावा. अर्थात त्यांच्याविरुद्ध फार जोरदार निदर्शनंही झाली नाहीत. कदाचित कोणत्या माणसाला किती किंमत द्यायची त्याच्या हिशेबानुसार हे झालं असेल. पण तरीही ते योग्य नव्हतं. कारण डास–ढेकूणही फार माजू देऊन चालत नाही.

हल्ली पण एकूणच कोणत्याही सभेला माणसं जमवणं फार कठीण जातं. पुणं आता पूर्वीचं राहिलं नाही. राजकीयच नव्हे तर मराठवाडा नामांतर किंवा अभाविप यांच्या कार्यक्रमांनासुद्धा हल्ली हॉल भरत नाही. माणसं आणावी लागतात.

◻

हिंदुस्थानी आंदोलनाचे निमंत्रक मधू मेहता ६ तारखेला पुण्यात आले. देशात सध्या खेळल्या जात असलेल्या नीतीहीन, तत्त्वशून्य राजकारणाला पायबंद घालण्याचा 'हिंदुस्थानी आंदोलन'चा प्रयत्न असून सध्या त्यांचाही कार्यक्रम 'पक्षांतरबंदी विधेयक मंजूर होण्यासाठी आग्रह धरा व फुटीरांना मतं देऊ नका' असाच आहे. या चळवळीची मुख्य कचेरी मुंबईला आहे आणि हळूहळू देशभर ही चळवळ पसरत आहे. त्यासाठीच श्री. मधू मेहता सध्या देशभर दौरा करत असून ६ तारखेला ते पुण्यात आले होते. त्यांचंही भाषण गोखले हॉलमध्येच झालं. तीच गर्दी, तीच संतापाची भावना ! सभेच्या शेवटी मेहतांनी 'फुटिरांना मत देणार नाही' अशी प्रतिज्ञा घ्यायला सांगितली सर्वांनीच उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सभेनंतर लगेचच रोटरी क्लबमध्ये मेहतांचं भाषण होतं. त्यांचं इंग्लिशवरही उत्तम प्रभुत्व आहे. त्यामुळे सुमारे पाऊण ते एक तास त्यांनी सध्या निर्माण झालेल्या राजकीय तणावाचं चित्र अतिशय उत्कृष्टपणे श्रोत्यांसमोर उभं केलं. इथेही भाषणाच्या शेवटी 'फुटिरांना मत देणार नाही' अशी प्रतिज्ञा त्यांनी घ्यायला सांगितली. पण प्रतिसाद आला नाही. सूट–बूट आणि टाय घातलेल्या, सेंट–पावडरी फासून आलेल्या रोटरियन्सना तसं करणं स्वतःच्या (तथाकथित) प्रतिष्ठेला धरुन वाटलं नसावं. मेहतांनी पुन्हा आवाहन केल्यावर चार–सहा जागांवरुन गुन्हा कबूल करत असल्यासारखे आवाज आले. मेहतांनी आणखी एकदा जोरदारपणे विचारलं की, 'तुम्हाला हे काही महत्त्वाचं

वाटत नाही का ? ज्यांचा या मताला पाठिंबा असेल त्यांनी हात वर करा आणि जोराने सांगा की, फुटारांना पाठिंबा देणार नाही.' तेव्हा कुठे एकमेकांकडे संशयास्पदपणे पहात हात वर होऊ लागले, कसेबसे शब्द बाहेर पडले आणि झटकन हात पुन्हा खाली आले. केवळ अशिक्षित, अडाणी जनतेमध्येच नव्हे तर या जायन्टस अँड लायन्स अँड रोटरियन्सनासुद्धा गदगदा हालवून जाग करणं आवश्यक आहे, हे त्यावेळी मधु मेहतांनी ओळखलं असावं. कार्यक्रमानंतर मात्र अनेक सदस्यांनी प्रत्यक्ष भेटून मेहता सांगतील ते काम व सहाय्य करण्याची तयारी दर्शविली. राटरी क्लबच्या अध्यक्षांनीही या चळवळीत सर्व प्रकारची मदत करण्याचं आश्वासन दिलं. काहीजणांनी अतिशय मनापासून सांगितलं, काहीजण सभ्यतेचा भाग म्हणून सांगत असावेत, तर मनुष्य एवढा जीव तोडून बोलताय तर त्याला काही आश्वासन तरी दिलं पाहिजे, या भावनेतून काहीजण पुढे आले होते.

आपल्या भाषणात मेहतांनी दिल्लीत नेमकं काय घडलं ते सविस्तरपणे सांगितलं. मंत्रिमंडळात सामील व्हायचं की नाही यावरून स्वर्णसिंग-काँग्रेसमध्ये दोन तट पडले होते. जोरदार वादंग सुरू होते. इतक्यात पक्षातील एक वरिष्ठ व्यक्ती त्या ठिकाणी आली आणि म्हणाली, 'कशाला एवढं भांडताय ? चरणसिंगांचं सरकार फार काळ टिकणार नाही, हे आम्हालाही माहित आहे. पण तरीही आपण मंत्रिमंडळात जाऊ या आणि महत्त्वाची खाती घेऊ या. कारण मध्यावधी निवडणुका अटळ आहेत. मग त्यासाठी काही पैशाची सोय करायला नको का ?' यावर सर्वचजण एकदम चूप झाले. मंत्रिमंडळात सामील होण्याचा निर्णय घेण्यात आला. शफी कुरेशींना मंत्रिपद दिलं नाही म्हणून कार्यकारिणीच्या सभेतून ते पाय आपटत निघून गेले. मंत्रिपद दिल्यावर शांतपणे परत आले. काँग्रेसवाल्यांनी आता मंत्रिमंडळातील सर्व महत्त्वाची खाती बळकावली आहेत आणि त्यामुळे चरणसिंगांसाठी जनता पक्षातून बाहेर पडलेला भालोदचा एक गट नाराज झाला आहे. आम्हाला काहीच बक्षिसी मिळाली नाही, अशी त्यांची भावना आहे.

□

९ ऑगस्ट ! क्रांतिदिन ! ! त्या दिवशी पुण्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. असाच एक मूक मोर्चा मंडईतील टिळक पुतळ्यापासून निघाला. मोर्च्यामध्ये माणसं फार नव्हती. जेमतेम पन्नास-पाऊणशे. पावसाच्या सरी येत होत्या. त्यामुळे प्रतिसाद कमी मिळाला असावा, असं संयोजक म्हणत होते. प्रसिद्ध उद्योगपती नवलमलजी फिरोदिया मोर्च्याचं नेतृत्व करत होते. कोणत्याही घोषणा नव्हत्या, आरडा-ओरडा नव्हता. पण म्हणूनच लोकांचं लक्ष जास्त वेधलं जात असावं. एकाने विचारलं, 'कोणत्या पक्षाचा मोर्चा आहे ?'

'कोणत्याच पक्षाचा नाही' असं उत्तर मिळाल्यावर तो बुचकळ्यातच पडला. बरं, मोर्च्यातील लोकांनी जे फलक हाती धरले होते त्यावर 'पक्षबदल हा लोकांचा विश्वासघात' 'पक्षांतरबंदी विधेयक मंजूर करा.' 'लोकसमितीमध्ये सामील व्हा' यासारख्या घोषणा लिहिलेल्या. त्यामुळे तर तो नुसतं पहातच राहिला. पक्षविरहित, स्वतःसाठी कोणतीच मागणी नसताना एखादा मोर्चा निघू शकतो, याचंच त्याला राहून राहून आश्चर्य वाटत होतं. मोर्चा भवानी पेठेतून जात होता. रस्त्यावर भरपूर चिखल; ट्रक्स-बैलगाड्यांची गर्दी. वाट काढणं मुश्कील होत होतं. हमालमंडळी पोती वाहात होती. पाठीवर धान्याची रास असूनही संध्याकाळच्या भाकरीची चिंता असणाऱ्या त्या माणसाला पक्ष, पक्षांतर, लोकशाही, लोकसमिती यामध्ये काही स्वारस्य असणं अशक्यच होतं.

मोर्चा भवानी पेठेतून लक्ष्मीरोडवर आला. संध्याकाळचे पाच वाजलेले. पावसाचा जोर वाढला. ज्यांच्याजवळ छत्र्या होत्या त्यांनी छत्र्या उघडल्या. काही जणांनी हातातील फलकांचाच आश्रय घेतला. मोर्चा थोडा विस्कळित झाला; पण आघाडीला नवलमलजी खंबीरपणे चालत होते. त्यांच्यामागे कृष्णाबाई निंबकर, सुमनताई दाभोलकर होत्या. प्र. द. पुराणिक होते, प्रा. एस. एस. काळे होते. लक्ष्मी रोडवर वर्दळ भरपूर होती. मोर्च्यामुळे वाहतुकीला अडथळा येत होता. रस्त्यावरून जाणारे लोक कुतुहलाने थांबत होते, फलक वाचत होते. मोर्च्यातील काही तरुण पत्रकं वाटत होते. रस्त्यावरून जाणाऱ्या पी. एम. टी. च्या बसेसमध्येही काही पत्रकं फेकली जात होती.

पावणेसहा वाजता मोर्चा शिवाजी मंदिरात आला. तिथे सहा वाजता प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचं भाषण होतं. गर्दी जमायला सुरुवात झाली होती. लोक मोर्चा उपोषणाला येत नाहीत; पण सभांना मात्र भरपूर गर्दी करतात. कदाचित मोर्चा वगैरे प्रकार त्यांना कमीपणाचा वाटत असावा. कदाचित एवढा वेळ आणि शक्ती त्यांच्याजवळ नसावी. कदाचित त्यांना त्यात रसच नसावा. संध्याकाळच्या वेळी एखादं चुरचुरीत भाषण ऐकण्यासाठी फक्त ते जमत असावेत; पण याच लोकांनी ७७ साली क्रांती घडवून आणली होती आणि त्याच्यावर विश्वास ठेवूनच हे सारं चालू होतं.

शिवाजीरावांचं भाषण सुरू झालं. तोच शब्दांचा फुलोरा, तीच शब्दांची कसरत. तीच लांब पल्लेदार वाक्यं, त्याच शाब्दिक कोट्या आणि अनुप्रास. भाषण फार रंगत नव्हतं; पण आपल्यासारखाच हा विचारवंतही सध्याच्या राजकीय परिस्थितीने अस्वस्थ झाला आहे, एवढंसुद्धा त्यांच्या भाषणाने त्या दिवशी भारावून जायला पुरेसं होतं.

□

याच दिवशी संध्याकाळी ७ वाजता एस. पी. कॉलेजच्या लेडी रमाबाई हॉलमध्ये खा. जगन्नाथराव जोशी यांचं भाषण होतं. पुन्हा तीच गर्दी, तीच उत्कंठा, तीच प्रतीक्षा. लांबरुंद देहयष्टी, दुटांगी धोतर, झब्बा आणि मानेभोवती असलेला गमछा असे जगन्नाथराव सव्वासात वाजता हॉलमध्ये येताच टाळ्यांचा कडकडाट झाला. जगन्नाथराव बोलायला उभे राहिले. खास जनसंघ धाटणीचं वक्तृत्व. टिपेचा आवाज, शब्दांचा फुलोरा, अधूनमधून नर्म विनोद, प्रभावी चढउतार. दोन तास भाषण चाललं होतं. श्रोते रंगून गेले होते. दिल्लीत खेळल्या गेलेल्या राजकारणात कुठलाही तात्त्विक वाद औषधालादेखील नव्हता. केवळ सत्तालोलुपतेमधून हे सारं घडलं, असं जगन्नाथरावांनी वारंवार, ठासून सांगितलं.

□

११ ऑगस्टला 'करंट'चे संपादक आयूब सैद यांचं जायन्टस इंटरनॅशनलतर्फे भाषण होतं. या भाषणामध्ये श्री. सैद यांनी इंदिराजी सत्तेवर येण्याचा धोका फार वाढला असल्याचा इशारा दिला. कारण केंद्र आणि राज्यं यांच्यामध्ये सुसंवाद नाही आणि केंद्रही बळकट व स्थिर नाही. एकाधिकारशाहीला याहून अधिक काय हवं ? देशातील राजकारणाच्या दोऱ्या आता इंदिराजींच्या हातात गेल्या आहेत. त्यांना हवं तेव्हा चरणसिंगांना खाली खेचून त्या मध्यावधी निवडणूक अनिवार्य करू शकतात. सध्या दिल्लीत मात्र एकही खासदार मध्यावधी निवडणुकांना तयार नाहीयाय. कन्वरलाल गुप्ता किंवा अटलबिहारींसारखा नेताही आपल्या मतदारांसमोर जायला आज तयार नाही. इंदिराजींना तेच हवं आहे. देशात असा एक बदल घडून येत आहे की जियून आता मागे जाता येणार नाही. श्री. सैद यांचा हा इशारा फार महत्त्वाचा आहे.

# लोकशाहीचे रक्षण

## सर्वांत महत्वाचा प्रश्न

वा. दा. रानडे

आपल्या लोकशाहीच्या भवितव्याचे दृष्टीने काही प्रश्न मला महत्वाचे वाटतात. सत्तेच्या राजकारणात ते दुर्लक्षिले जात आहेत. त्यात लोकशाहीलाच धोका आहे. त्या धोक्यापासून ती कशी वाचवायची हा लोकशाहीवाद्यापुढे चिंतेचा विषय आहे.

देशातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून अमेरिका आपला गौरव करते; शेजारच्या देशांप्रमाणे आपल्याकडे लष्करी क्रांती झाली नाही यावर आम्ही आत्मसंतुष्ट आहोत; पण देशाला स्थिर शासन देण्यास आमचे नेते अयशस्वी ठरत आहेत, पोलीस आंदोलनाचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांना लष्कराची मदत घ्यावी लागत आहे. जातीय दंगलीतही शांतता प्रस्थापित करण्यासाठी लष्कर बोलवावे लागत आहे. आपल्याशिवाय सरकार चालत नाही, हे याप्रमाणे दिसून येऊ लागल्यावर मग आपणच सत्ता हाती घेऊन राजकीय पक्षांनी केलेली घाण स्वच्छ का करू नये असे एखाद्या महत्वाकांक्षी लष्करी नेत्यास वाटणे व त्याने तसे प्रयत्न करणे ही शक्यताही नाकारता येणार नाही. तेव्हा लोकशाही कशी वाचवायची हा आपल्यापुढील आज सर्वांत महत्वाचा प्रश्न आहे.

स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्याबरोबर लोकशाही मूल्यांचाही पुरस्कार आपल्या नेत्यांनी केला. स्वातंत्र्य मिळताच प्रजासत्ताक भारताची लोकशाही तत्त्वांवर अधिष्ठित घटना आपण तयार केली. देशात सहा निवडणुका पार पडल्या; पण लोकशाही आपल्याकडे खऱ्या अर्थाने रुजली आहे असे म्हणता येईल का? लोक हेच लोकशाहीचे मुख्य अधिष्ठान. एकवीस वर्षांवरील सर्व प्रौढांना आपल्या घटनेने मतदानाचा हक्क दिला हीच पहिली मोठी चूक झाली असे बुद्धिजीवी वर्गाला वाटते. हा वर्ग सत्तेच्या स्थानांपासून बाजूला फेकला गेला असून ही पदे बहुजनसमाजाच्या प्रतिनिधींनी बळकावली आहेत. आपल्याला राजकारणात आता काही स्थान नाही; प्रौढ मताधिकाराच्या हक्कामुळे हे सारे झाले अशी या वर्गाची तक्रार आहे. बहुसंख्य मतदार अशिक्षित; मत कशासाठी द्यावयाचे, निवडणुका कशासाठी आहेत, याची त्यांना काहीही माहिती नसते. गावचा पाटील किंवा आपल्या जातीचा प्रमुख सांगेल त्या चित्रावर फुलीचा शिक्का मारणे एवढेच त्याचे काम मते विकली जातात. पैशाप्रमाणेच सत्ता, जात यांची दडपणे येतात. यातून व्यक्त होणारे लोकमत कितपत खुले व निर्भय मानता येईल? असे या बुद्धिजीवी वर्गाचे म्हणणे. मतदारावर अनेक प्रकारची दडपणे येत असतात हे खरे; पण त्या दडपणांपुढे मान न तुकवता धीटपणाने मत देण्याइतका मतदार आता जागृत झाला आहे हे १९७७ च्या निवडणुकीत त्याने इंदिरा गांधींच्या हुकूमशाही सरकारला खाली ओढले यावरून स्पष्ट झाले.

सर्व प्रौढांना मताधिकार देण्यात चूक झाली का? १९५२ च्या पहिल्या निवडणुकीपासून हा प्रश्न चर्चिला गेलेला आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू या बाबतीत साशंक होते. युनेस्कोतर्फे झालेल्या एका परिसंवादात आपली ही शंका बोलून दाखविताना ते म्हणाले होते, 'प्रौढ मताधिकाराच्या आधुनिक लोकशाही पद्धतीत निवडलेल्या व्यक्तीचा गुणवत्तेच्या दृष्टीने दर्जा हळूहळू कमी होत जातो. कारण विचाराचा अभाव आणि प्रचाराच्या आवाजाचा प्रभाव, ज्याचा आवाज जास्त तिकडे मतदार झुकतो पुनरुक्तीचाही त्याच्यावर परिणाम होत असतो. तो एक तर हुकूमशहाला किंवा मूक राजकीय प्रतिनिधीला निवडून देतो. हा मूक प्रतिनिधी संवेदनाहीन असतो.' (ट्रिब्यून २२–१२–१९५१) याचा अर्थ नेहरूंना प्रौढ मताधिकार नको होता का? आपल्यासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात वरच्या पातळीवर अप्रत्यक्ष निवडणुका आणि कनिष्ठ पातळीवर प्रत्यक्ष निवडणुका असाव्यात अशी सूचना त्यांनी केली होती; पण त्याबाबत त्यांचा आग्रह नव्हता. निवडणूकपद्धतीत हा बदल घडवून आणणे त्यांना अशक्य खास नव्हते. 'पुढचे पाऊल टाकले आहे. आता माघार घेणे शक्य नाही व त्याची आवश्यकताही नाही,' असे मत आचार्य कृपलानींनी या बाबत व्यक्त केले होते आणि मतदाराच्या शिक्षणावर भर दिला होता आणि तेच कार्य दुर्लक्षित राहिलेले आहे.

श्री. जयप्रकाश नारायण यांनी सुचविल्याप्रमाणे अगदी तळापासून मतदार समित्यांचे जाळे उभारून मतदारांनी प्रभावी संघटना स्थापन करायला हवी.

दुसरा प्रश्न राजकीय पक्षांच्या स्वरूपाचा. देशात एकाच पक्षाची सत्तेची मक्तेदारी नको. त्याचप्रमाणे अनेक छोटे दुबळे पक्षही नकोत. दोन तुल्यबळ पक्ष असलेली पक्ष पद्धती केव्हाही चांगली. तीस वर्षे देशात काँग्रेसला प्रभावी पर्यायी पक्षच नव्हता. १९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाच्या रूपाने असा पक्ष प्रथम उभा राहिला आणि त्याने विजय मिळवून सरकारही स्थापले. संघटना काँग्रेस, जनसंघ, भालोद, समाजवादी, लोकशाहीवादी काँग्रेस आणि काँग्रेसमधील बंडखोराचा गट एकत्र येऊन हा पक्ष स्थापन झाला; पण त्यातला घटकवाद नष्ट न झाल्याने संघर्ष वाढत गेले आणि पक्षात फूट पडली. फाटाफुटीने २७ महिन्यातच हा पक्ष आपले हुकमी बहुमत गमावून बसला. तात्त्विक मतभेदामुळे नव्हे तर वैयक्तिक सत्ताकांक्षेमधून हे विघटन झाले.

देशात प्रभावी पर्यायी पक्षही निर्माण झाले नाहीत. काँग्रेसमध्ये फूट पाडून इंदिरा गांधींनी वेगळा पक्ष स्थापन केला. या दोन काँग्रेसमध्ये इंदिरा काँग्रेसलाच अधिक पाठिंबा असल्याचे दिसून आले. निवडणुकात इंदिरा काँग्रेसनेच अधिक जागा मिळवल्या. स्वर्णसिंग काँग्रेस निष्प्रभावी पक्ष असल्याचे दिसून आले. इंदिरा गांधींच्या हुकूमशाही कार्यपद्धतीत काहीही बदल झाला नाही. संजयचा त्यांच्यावरील प्रभावही कमी झाला नाही. संजयच्या राजकारण–प्रवेशास अरस यांनी विरोध दर्शविला व त्याचे पर्यवसान अखेर इंदिरा काँग्रेसमध्ये फूट पाडण्यात झाले. इंदिरा काँग्रेस जनता पक्षाला लोकशाही पर्याय होऊ शकला नाही. दोन्ही काँग्रेस पक्षांच्या एकीकरणाचे प्रयत्न अयशस्वी झाले. आता इंदिरा गांधींना वगळून बाकी काँग्रेसजनांची संयुक्त काँग्रेस उभारण्याच्या हालचाली चालू आहेत. जनता पक्षातील काँग्रेसजनांनाही आपल्या बाजूला आणून सर्व नव्या-जुन्या काँग्रेसवाल्यांचा प्रभावी पक्ष स्थापण्याचे प्रयत्न चालू आहेत; पण सत्ताकांक्षी नेत्यांचे संघर्ष लक्षात घेता असा पक्ष उभा राहण्याची शक्यता फारशी नाही. सबंध देशात प्रभावी पर्यायी पक्ष उभारण्याइतकी डाव्याची आघाडीही प्रभावी नाही. परिस्थिती निराशाजनक असली तरी सगळेच पक्ष दुबळे असल्याने हुकूमशाही प्रवृत्तीच्या इंदिरा काँग्रेसला बाजूला ठेवून बाकी पक्षांनी संयुक्त आघाडी उभारणे, मतभेदापेक्षा मतैक्यावर भर देणे हाच लोकशाही वाचविण्याचा मार्ग आहे. □

# एक प्रवाहपतित राजकारणी - यशवंतराव चव्हाण

शाम केळकर

भारत देशात काही काही व्यक्तींचे अकारण अवाजवी स्तोम माजविले गेले आहे. भारतातील प्रत्येक आणीबाणीच्या क्षणी या व्यक्तींचे अंतरंग उघडे पडले आहे; पण त्यांच्या प्रतिमानामक तथाकथित भानगडीने त्या व्यक्तींचे कौतुक थांबत नाही. महाराष्ट्रात अशा दोन नामवंत व्यक्ती आहेत. एक आहेत आचार्य विनोबा भावे आणि दुसरी व्यक्ती आहे यशवंतराव चव्हाण.

श्री. यशवंतराव चव्हाण यांना राष्ट्रपतींना मंत्रिमंडळ बनविण्याची शक्यता अजमावून पाहण्यासाठी आमंत्रण दिले आणि चार दिवसांची मुदत दिली. राजकारणात प्रत्यक्ष कधीही सहभाग न घेतलेल्या मला हे स्वच्छ दिसत होते की – यशवंतराव चव्हाण यांना अर्थातच हे कालत्रयीही शक्य होणार नाही. तरी पण खोटे बोलण्याच्या नेहमीच्याच सराईतपणे त्यांनी आमंत्रण स्वीकारले व वाटाघाटींचा घोळ घातला.

मंत्रिमंडळ करायचे म्हणजे चरणसिंग आणि इंदिरा काँग्रेस या दोघांचा पाठिंबा घ्यायचा हे स्पष्ट होते आणि पंतप्रधानपदासाठी स्वतःचा पक्ष फोडण्यासाठी स्वार्थी आणि नीच कपटबुद्धी दाखविणारे चरणसिंग यशवंतरावांना पंतप्रधानपदासाठी पाठिंबा देतील हे उघडउघड अशक्य होते. त्याचप्रमाणे इंदिरा गांधींविरुद्ध रोज उठल्यासुठल्या तोंडदेखली का होईना टीका करणाऱ्यां यशवंतरावांना इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा मिळणे पण अशक्य होते. तरीही मनचे मांडे खायला काय जाते? त्यातदेखील राष्ट्रपतींनी दिलेले मांडे अधिकच गोड लागले !

व्यवस्थापनशास्त्रात एक तत्त्व सांगितलेले असते. त्याला बहुधा 'पीटर तत्त्वज्ञान' म्हणतात. ते तत्त्व म्हणते– A person rises to his own level of incompetence. एखादा पुरुष किंवा स्त्री चढतचढत ज्या पदाला ती लायक नाही अशा एखाद्या पदापर्यंत पोचते. कुठल्याही पदावरील माणूस त्या पदासाठी पात्र ठरला, त्याने योग्य कर्तबगारी दाखविली की त्याला बढती मिळते. मग तो अशा एका पदावर स्थिर होतो की, त्या पदावर तो काहीच कर्तबगारी दाखवीत नाही. मग तो पुढे साहजिकच पुढील बढतीस अपात्र ठरतो. म्हणजेच ज्या पदावर तो काम करतो, त्या पदासाठी तो अपात्र असतो; पण त्याला पदावनती करणे शक्य नसल्यामुळे तो त्याच पदावर राहतो.

यशवंतराव चव्हाणांनी आपली अपात्रतेची पातळी गाठली आहे. संसदीय काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून त्यांची कारकीर्द एकदम अयशस्वी ठरली आहे. हीच त्यांची अपात्रतेची पातळी.

नेतेपदावरील माणूस खंबीर धोरणाचा, तत्त्वांची थोडी तरी चाड बाळगणारा व आग्रही असावा. कुंपणावर बसणारा माणूस कधीच राष्ट्रीय नेता होऊ शकत नाही. इंदिरा गांधी यांनी मोरारजीभाई देसाई यांना मंत्रिमंडळामधून अर्धचंद्र दिला तेव्हा चव्हाणांना वाईट वाटले म्हणे; पण त्यांनी केले काहीच नाही. प्रवाहाचे मत इंदिरा गांधींच्या बाजूला होते. यशवंतरावांना प्रवाहाविरुद्ध पोहोण्याची सवय नाही. सर्व गोष्टी कमी श्रमात, शरीराला यत्किंचित त्रास न पडता व्हायला हव्यात. सत्ता क्षणभरही सुटता कामा नये. यशवंतरावांनी इंदिरा गांधींच्या पाठिराख्यांसह प्रवास चालू ठेवला. त्या सुमारास इंदिरा गांधींची एक्सप्रेस सुटलेली नव्हती. पॅसेंजर होती; पण तरी त्यांना उतरणे जमले नाही. ७–८ वर्षांनी पॅसेंजरची 'आणीबाणी एक्सप्रेस' झाली. मग तर उतरण्याचा विचारही यशवंतरावांच्या मनात येईनासा झाला. जसलोक हॉस्पिटलात राष्ट्रपती फकरुद्दीन अहमद जयप्रकाश नारायण यांना जाऊन भेटले. एवढेसुद्धा साहस चव्हाणांना जमले नाही. उलट एकाच विमानातून प्रवास करून देखील त्यांनी 'जेपीं' ची विचारपूस केली नाही.

आणीबाणी शिथिल केलेल्या निवडणुकांचे निकाल अनपेक्षित लागले. इंदिरा गांधींची लोकप्रियता उतरलेली दिसली विशेषत: बुद्धिमान् वर्गात इंदिराजींची प्रतिष्ठा जवळजवळ नामशेष झाली. पण अद्यापही मागासलेल्या व अशिक्षित वर्गात त्यांचे वलय टिकून आहे असा प्रत्यय आला. इंदिरा गांधींच्या लोकप्रियतेचा फायदा तर राहावा; पण त्याचबरोबर सुशिक्षितवर्गातील जी कलंकित प्रतिमा आहे त्याची आपल्यावर छाया पडायला नको – अशा विचाराने तारेवरची कसरत त्यांनी सुरू केली. त्यांचा इंदिराविरोध काही लोकांना खरा वाटतो; पण तो असा वरपांगी, स्वार्थी, पोकळ व दिखाऊ आहे. इंदिरा गांधींच्या काँग्रेसमध्ये असण्यामुळे होणाऱ्या गोष्टींचे फायदे उपटायला ते तयार होते व आहेत; पण त्याचे अपरिहार्य तोटे त्यांना नको आहेत. एवढ्यासाठी त्यांनी इंदिराजींना विरोध असल्याचे सतत भासवत आणले आहे.

## फक्त फायदे हवेत

थोडेसे विषयांतर करून इथे हेही सांगितले पाहिजे, की अशीच भूमिका जनता पक्षात माजी जनसंघावर खार खाणाऱ्या 'भालोद' व समाजवादी गटांची आहे. निवडणूक जिंकण्यासाठी जनसंघ व त्यांची साहाय्यक संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे साहाय्य घेताना त्यांना कसलीच लाजलज्जा व शरम वाटली नाही; पण जनसंघीयांच्या-

मुळे त्यांच्या तथाकथित पुरोगामी प्रतिमेला व मागासलेल्या वर्गातील प्रभावाला शह मिळाला. त्यांची काही पारंपारिक मते काँग्रेस (आय) व काँग्रेसमध्ये विभागली गेली. म्हणून त्यांचे जनसंघावर खार खाणे सुरू झाले. समाजवाद्यांची पण जनसंघामुळे होणारे फायदे उपटायची तयारी होती व आहे; पण तोटे सोसायची तयारी नाही. स्वतःच्या बळावर ४०-५० मतेही मिळवण्याची पात्रता अंगी नसलेल्या श्रीमती शांति नाईक आता मंत्रिपदावरून जनसंघाला दुगाण्या झाडत आहेत. निवडून मात्र त्यांच्याच पाठिंब्यावर आल्या. म्हटलेलेच आहे 'प्रासादशिखरस्थोऽपि काक: किं गरुडायते ?'

यशवंतराव चव्हाण व जयप्रकाश नारायण हे दोघे सुमारे १० वर्षांपूर्वी एकाच समितीवर सदस्य होते. पक्षांतरबंदीविधेयक आणण्याचे अभिवचन त्या वेळी काँग्रेसने दिलेले होते व त्याचा मसुदा करण्यासाठी नेमलेल्या समितीचे चव्हाण सदस्य होते. आज दहा वर्षांनंतर जेव्हा राष्ट्रपतींनी त्यांना मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण केले तेव्हा चव्हाणांनी म्हणायला हवे होते, 'सत्तेसाठी पक्षांतर करून आलेले चरणसिंग व हुकुमशाहीवादी इंदिरा गांधी यांना वगळूनच मी मंत्रिमंडळ बनविण्याची शक्यता अजमावून पाहीन व अशी शक्यता फक्त जनता पक्षाशीच सहकार्य करून पडताळता येईल!...'

पण चव्हाणांनी डरकाळी काय फोडली ? जातीयवादी शक्तींशी आम्ही सहकार्य करणार नाही!' उठल्यासुटल्या फुगून बसणारे. हृदयविकाराचा (खोटा) झटका आल्याचे सांगून महिनोन्महिने सूरजकुंडात जाऊन लपणारे, अहंमन्य व सत्तालोलुप चरणसिंग, कुठल्याही पक्षाच्या चिरफळ्या उडविण्यात निष्णात असलेले मधु लिमये, ज्यांचेमुळे सर्वत्र भारताच्या नावाला काळिमा लागला असे विदूषक राजनारायण, राष्ट्रीयीकरणपटु जॉर्ज, कपटकारस्थानी बहुगुणा आणि कमिशनप्रसिद्ध बिजू पटनाईक व देवराज अर्स या सर्वांना जाऊन ते भेटले. जनता पक्षावरील अविश्वासाच्या ठरावाला खरे म्हणजे ही सर्व बदमाष मंडळी कारणीभूत; पण जनता पक्ष सोडल्यामुळे तीच पावन झाली !

## अपयशाचे खापर दुसऱ्यावर

परराष्ट्रखात्याच्या कारभारात वाजपेयींनी कोणती जातीयता आणली त्याचे एकही उदाहरण चव्हाणांना देता आले नाही. उलट सहा-आठ महिन्यांपूर्वी यशवंतरावांनी जेव्हा अविश्वासाचा ठराव आणला होता, तेव्हा गृहमंत्री होते चरणसिंग. चरणसिंगांना हरिजनांवरील अत्याचारप्रकरणी जेव्हा सभागृहात बोलताच येईना तेव्हा त्यांना मदत केली मोरारजीभाईंनी. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढल्या. त्यानंतर तातडीने गंभीर उपाययोजना करणे आवश्यक होते; पण संबंधित मंत्री श्री. बहुगुणा आणि चरणसिंग यांनी काहीही केले नाही. कोळशाची टंचाई, पोलादाची टंचाई वाढतच आहे; पण जनसंघाविरुद्धच्या लढ्यात दंडवते साथ करीत नसल्यामुळे वाघिणीची टंचाई भासते असे खोटे कारण देऊन बिजू पटनाईक, दंडवते यांना दोषी ठरवून मोकळे झाले. व्हिएटनाम, काम्पुचिया, चीन, इजिप्त, इस्राएल-सर्वच प्रकरणी वाजपेयी आणि मोरारजींनी सम्यक् तटस्थ भूमिका आचरल्यामुळे मॉस्कोवादी मधु लिमये यांनी वाजपेयींवर टीकास्त्र सोडले; पण त्यांचाच अश्वत्थामा झाल्याखेरीज राहाणार नाही ! जनता पक्षाच्या अपयशाला जी मंडळी कारणीभूत आहेत, पण अपयशाचे खापर दुसऱ्यावर ढकलण्याची 'यशवंत'नीती ज्यांना अवगत आहे, अशीच मंडळी जनता पक्षातून जनता (एस्) मध्ये दाखल झाली आहेत. ही जनता 'एस्' म्हणजे सेक्युलर (निधर्मी) जनता नसून संजयवादी जनता आहे; पण यशवंतरावांना अशा लोकांशी वाटाघाटी करण्यात, त्यांच्या अटी ऐकून घेण्यात कोणताही अपमान वाटला नाही !

यशवंतरावांनी इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा घेणार नाही असेही उद्गार काढले नाहीत. लोकशाहीवादी शक्ती बळकट कराव्यात असे तोंडदेखले उद्गार काढायचे व प्रत्यक्षात लोकशाही विकावयास निघालेल्या चरणसिंगांशी व हुकुमशाहीचा खेळ खेळून दाखविणाऱ्या इंदिरा गांधींशी पण सहकार्य करावयास तयार व्हावयाचे, ह्यात यशवंतरावांनी कोणती तत्त्वे व निष्ठा बाळगल्या ते उघड आहे.

अविश्वासाचा ठराव मांडताना यशवंतराव म्हणाले की, "वाजपेयी म्हणतात, 'देशकी हालत मत पूछिये। विदेशकी पूछिये। बहुत अच्छी है।'" वाजपेयींची वाक्ये काय दाखवितात ? एक प्रखर राष्ट्रवादी म्हणून त्यांना देशाची परिस्थिती चिंताजनक वाटते. देशाची काळजी वाटते हेच दाखवितात. याउलट चरणसिंग, बिजू, मधू व राजनारायण या चौकडीला देशाची कधी तरी चिंता वाटली आहे काय ? राष्ट्राविषयी ज्यांचे मनात नितांत प्रेम असते अशांनाच सद्यःस्थिती चिंताजनक वाटते.

देशापुढील प्रश्न अवाढव्य आहेत, असंख्य आहेत. त्याबद्दल बोलायचे सोडून जणु काही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हाच देशापुढील प्रश्न आहे असा उगीचच बागुलबोवा केला गेला आहे. जॉर्ज, मधूंनी तो केला आहे. बोंबा मारण्यात आपण मागे राहिलो तर आपल्याला उगाचच शिमग्यात भाग न घेतल्याचे पाप लागेल, म्हणून चव्हाण पण त्यात सहभागी झाले आहेत. महाराष्ट्रात उत्तमराव पाटील यांच्या सहकार्याने अस्तित्वात आलेल्या मंत्रिमंडळाला यशवंतरावांची संमती आहे. केरळमध्ये मुस्लिम लीग चालत आहे. ऑल इंडिया डी. एम्. के. चा पाठिंबा मिळाला तरी हरकत नाही. निरंकारीविरुद्ध दंगली करणाऱ्या अकालींचा पाठिंबा तर एकदम स्वागतार्ह आहे. शाही इमाम बुखारी, बोहरा धर्मगुरू यांचा आशीर्वाद मिळाला तरी तो स्वीकारावयाची तयारी आहे. फक्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघ चालणार नाहीत! का ? तर तोंडदेखले पुरोगामित्व मिरवणारे आम्ही असलो तरी आमच्या मनात अद्यापही अस्पृश्यता आणि जातीयता बाकी आहे. जनसंघावरती दुगाण्या झाडणे ही मानसिकरीत्या अस्पृश्यतेची आणि जातीयतेची लक्षणे आहेत.

दुसऱ्या पक्षाशी संयुक्त मंत्रिमंडळ करताना सत्तावाटप हाच प्रधान उद्देश असणार हे मलापण समजते; पण त्यासाठी 'कोरा चेक' देण्याची भाषा करणाऱ्यांबरोबर बोलणीसुद्धा करावयास नकोत.

राजकारणी लोकातदेखील काही वर्षांपूर्वी थोडी तरी लाज बाकी असे. संमिश्र मंत्रिमंडळ करताना दोन्ही पक्षांना अनुकूल व मान्य असा समान कार्यक्रम हा मंत्रिमंडळस्थापनेचा निकष असे. महाराष्ट्रातदेखील मंत्रिमंडळ स्थापन करताना ' चाळीस कलमी कार्यक्रम ' नावाचा एक कार्यक्रम निकष म्हणून घेतलेला आहे.

केंद्रात यशवंतराव चव्हाण व जनता ( एस ) यांच्यातील वाटाघाटीत कार्यक्रमांचा प्रथम उल्लेखही झाला नाही. आता झाला; पण तो इतर खासदारांचे आग्रहाखातर. त्यापूर्वी कार्यक्रम असलाच तर ' जनसंघ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ' यांचे नावे सार्वजनिक बोंबाबोंब ठोकणे व या सबबीखाली इंदिरा गांधी आणि संजय गांधी यांचे हात बळकट करणे हाच असावा.

फक्त जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर यांनी कार्यक्रमावर आधारित असे कोणत्याही ( इंदिरा काँग्रेस सोडून ) पक्षाचे सहकार्य स्वीकारार्ह मानले आहे. अमक्याला काढा, तमुकच नेता ठेवा, अशा कार्यक्रमांशी यत्किंचितदेखील संबंध नसलेल्या अटी जनता पक्ष स्वीकारणार नाही असे ठामपणे सांगितले आहे. काही झाले तरी आणीबाणीतदेखील एक्सप्रेस थांबविण्याचा निकराचा प्रयत्न करणारे ते एक सच्चे नेते आहेत. यशवंतरावाच्याकडून सच्चेपणाची अपेक्षाच करणे व्यर्थ आहे.

विरोधीपक्ष नेतेपद त्यांना मिळाले; पण नंतर पक्षात फूट पडली. हळूहळू एकेक खासदार इंदिरा काँग्रेसमध्ये गेला. यशवंतरावांचे आसन गेले. त्याजागी स्टीफन विराजमान झाले. देवराज अरस यांचे व इंदिराजींचे भांडण झाले. त्यात स्टीफनने इंदिराबाईंची बाजू घेतली. देवराज म्हणाले, ' स्टीफनची विरोधी पक्षनेतेपदावरून उचलबांगडी केल्यावाचून मी राहाणार नाही. ' म्हणून मग देवराज अरस यांचे खासदार पुन्हा काँग्रेसमध्ये गेले. यांना यशवंतराव व रेड्डी यांनीच हाकलले होते आणि माझी खात्री आहे की, नेहमीप्रमाणे ही हकालपट्टी सहा वर्षांसाठी असेल; पण यशवंतरावजींनी लगेच देवराज यांची मदत स्वीकारली. पक्षातून हाकलण्याच्या ठरावाची मग काय मातब्बरी राहिली ?


तेव्हा यशवंतरावांनी ही नेतेपदाची जबाबदारी झिडकारून देणेच चांगले. एक साधा मंत्री म्हणून त्यांची कारकीर्द फारशी अयशस्वी नाही. जनता पक्ष कदाचित् अजूनही त्यांना दुसऱ्या क्रमांकावर घेण्यास सहज तयार होईल. ही त्यांची अत्युच्च पातळी. भारतासारख्या देशात हे स्थान पण फारच कमी लोकांना मिळणे शक्य आहे. यशवंतरावांनी आपली प्रसिद्ध ' घूम जाव ' ( He is a past master in about turn– इति जगजीवनराम ) प्रणाली पुन्हा यशवंत करावी, म्हणजे त्यांनी गमावलेली प्रतिष्ठा त्यांना थोडी फार सावरता येईल. या कामी त्यांचे मानसपुत्र त्यांना यशस्वी करतील. यशवंतराव, शरदचंद्र पवारांचा सल्ला स्वीकारून आपणच निर्माण केलेल्या गुंत्यातून बाहेर पडतील काय ? □




" कठीण आणि खरखरीत टूथ पावडरी तुमच्या हिरड्या नि दातांना इजा करू शकतात..."

# कोलगेट टूथ पावडरने तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे संरक्षण करा — नि श्वास दुर्गंधीही थांबवा !




कोलगेट टूथ पावडर अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हलुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटींत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.**

TP.G.30 MR

बिंदुकथा

# सुखी

बिंदुसार

तो अस्वस्थपणे उभा होता. नेहमीची बस निघून गेली होती. बस ही ऑफिसात पोहोचण्याच्या क्रियेतील अनिश्चित बाब होती. रोज या सुमारास त्याला नेहमीच टेन्शन येई. ठराविक बस चुकली की हे टेन्शन वाढे. आजही तसेच झाले.

आणखी पाच मिनिटे वाट पाहून रिक्षा करण्याचे त्याने ठरवले. रिक्षावर खर्च करणे त्याच्या नेहमीच जिवावर येई. ते पैसे फुकट गेल्यासारखे त्याला वाटत. महिन्यातून तीन-चारदा रिक्षावर खर्च होई. प्रत्येक वेळी त्याच्या मनाची तगमग होई.

पाच मिनिटे संपत आली. एवढ्याशा वेळात त्याने हातातल्या घड्याळाकडे पंचवीस वेळा नजर टाकली. हे जाणवले तेव्हा आपण अगदी मूर्ख आहोत असे त्याला वाटले. थोडा उशीर झाला तर साहेब बोलत नसे-पण कुत्सितपणे भिंतीवरच्या घड्याळाकडे रोखून पाही.

एका मिनिटात त्याला निर्णय घ्यावा लागणार होता – रिक्षा करायची की नाही ?

त्याच्यासमोर एक स्कूटर येऊन उभी राहिली. त्याचे लक्ष नव्हते. मान उंचावून तो बस-रिक्षा काही दिसते का ते पहात होता.

'एक्स्क्यूज मी–आपल्याला कोठे जायचेय ?' स्कूटरवाल्याचा प्रश्न ऐकून तो दचकला व स्कूटरवाल्याकडे पाहू लागला. एक मध्यमवयीन, स्थूल गृहस्थ स्कूटरचे हँडल पकडून, एक पाय जमिनीला टेकवून उत्तराच्या अपेक्षेने बघत होता. रिमलेस चष्मा, काळे-पांढरे अस्तव्यस्त केस, खादीचे चुरगळलेले पँट-बुशशर्ट असा त्याचा अवतार होता.

घड्याळाकडे पहात त्याने उत्तर दिले, 'मला गांधी चौकात जायचं आहे.' मागच्या सीटवर अर्धवट थाप मारीत, हसून स्कूटरवाला बोलला,

'बसा-मला जरा वेगळ्या बाजूला जायचंय. पण मी सोडतो तुम्हाला !'

'उगीच कशाला तुम्हाला त्रास ?' असे पुटपुटत तो मागच्या सीटवर बसला. स्कूटर चालू झाली.

'माझे नाव रतिलाल झवेरी.' स्कूटरवाला म्हणाला.

रहदारी सफाईने पार करीत झवेरी एकीकडे बोलत होता.

त्याच्या उत्साही बोलण्यातून सद्भावना उचंबळत होती.

'माझा हा नियम आहे. शहरभर फिरायचे आणि कोणाला काही मदत लागली सर करायची. रोज काही पुण्यकृत्य केल्याखेरीज अन्नग्रहण करीत नाही मी !'

मागच्या सीटवर तो बुचकळ्यात पडून ऐकत होता. त्याने औपचारिकपणे विचारले, 'आपण काय करता ?'

झवेरींनी मान वळवून अर्धवट मागे पाहिले व ते बोलले,

'काहीही नाही ! मी सुखवस्तु आहे. आमच्या कुटुंबाचा कापडाचा धंदा आहे; पण मी त्यात लक्ष घालीत नाही. फार पूर्वी मी खूप धंदा केला. गडगंज कमावलं; पण आता जीव रमत नाही त्यात.'

काय भाग्यवान माणूस आहे ! त्याच्या मनात आलं. पुण्यकृत्य करण्यासाठी तरी एवढा मोकळेपणा कोणाला मिळतो ? विचाराची आवर्तं आवरीत तो प्रतिसाद देतो.

'वा, छान आहे की !'

झवेरी मान हलवीत हंसतात व म्हणतात, 'खरंच छान आहे ! माझ्याइतका सुखी माणूस नाही सापडायचा–भाऊ–मुलं सगळा व्याप बघतात, घरी सगळं ऐश्वर्य हात जोडून उभं आहे. सत्कृत्यं करण्यातच सारा वेळ खर्च करतो.'

थोडा वेळ दोघंही काही बोलत नाहीत. मग आठवण झाल्याप्रमाणे झवेरी विचारतात, 'वाटेत पाच मिनिटं थांबलं तर तुम्हाला चालेल का ?'

तो घड्याळाकडे पहात म्हणतो, 'हां म्हणजे तसं चालेल.'

'पाचच मिनिटं.' एका मोठ्या देवळापाशी स्कूटर थांबवीत झवेरी म्हणतात. गाडी उभी करून गडबडीने चालू लागतात. मागे वळून त्याला बोलावतात.

'या ना आपणही !'

तो पाय ओढीत, हातातली ब्रीफकेस सावरीत, त्यांच्यामागे चालू लागतो. झवेरी देवळात शिरून दोन-तीन देवांपुढे साष्टांग लोटांगणे घालतात. भराभरा प्रदक्षिणा घालतात.

त्यांचे बोलणे चालूच असते.

'साहेब, खूप लोकांना मदत हवी असते. अगदी क्षुल्लक सहाय्य हवं असतं; पण ते मागण्याचं ही माणसं टाळतात. अशांना मी जमेल तं सहाय्य करतो.'

वाटेत एक व्यापाऱ्यासारखे दिसणारे गृहस्थ झवेरींना नमस्कार करतात. उलट नमस्कार करून झवेरी विचारतात, 'केम केशुभाई–मजा मां ?'

दोघे देवळाच्या बाहेर पडतात. झवेरी खिशात हात घालून काही नाणी बाहेर काढतात.

देवळाच्या कट्ट्याला लागून भिकाऱ्यांची रांग बसलेली असते.

प्रत्येकाच्या वाटीत एकएक नाणे टाकीत झवेरी पुढे जातात. काही भिकारी झवेरींना ओळखत असावेत. ते मान लववून, हास्यमुद्रेने त्यांना नमस्कार करतात.

'केम भिकू–सारु छे ने ?' झवेरी एका वृद्ध भिकाऱ्याला विचारतात. त्याला किंचित् हसू येते. भिकाऱ्याचे काय सारू असणार ? पण झवेरींच्या झपाट्यापुढे सारे आसमंतच प्रसन्न होऊन उठलेले असते.

आणखी दोन-चार नमस्कार स्वीकारीत झवेरी गाडीपाशी येतात व म्हणतात,

'चालो ! रोज मी या देवळात येतो. याच वेळी. इथे असतील त्या भिकाऱ्यांना थोडे थोडे पैसे देतो. चलो ! तुम्हाला मात्र माझ्यामुळे उशीर झाला.'

'छे, छे !' असे म्हणत तो मागच्या सीटवर बसतो. स्कूटर निघते.

झवेरी बोलू लागतात, 'आता तुम्हांला सोडलं की मी कुठं जाणार ठाऊक आहे ?'

'कुठं जाणार ?'

'पोलिसकमिशनरच्या ऑफिसमध्ये. आज माझा तो वार आहे. काय होतं की कधी कधी लहान मुलं चुकतात. पळून जातात. त्यांची माहिती मी पोलिसांकडून घेतो. माझ्या खूप ओळखी आहेत. अशा मुलांचा पत्ता शोधण्याचा मी प्रयत्न करतो. कधी कधी जमतं.'

'असं ? कमाल आहे !'

'आठवड्यातून तीन दिवस मी सार्वजनिक इस्पितळात जातो. ज्यांच्याकडे कोणी येत नाही अशा पेशंटची हालहवाल विचारतो. काही किरकोळ वस्तू लागल्या की नेऊन देतो– अरे– तुमचा गांधी चौक आला की !'

गाडी थांबवत झवेरी म्हणतात. तो खाली उतरतो. आभाराचे काही शब्द उच्चारण्याचा प्रयत्न करतो; पण त्याच्या लक्षात येते की झवेरींचे आभार मानणं आवश्यक नाही. उलट ते हास्यास्पदच ठरेल. नुसताच हसून तो हात हलवतो झवेरी. त्याचा हात हातात घेऊन म्हणतात, 'अच्छा ! हूँ निकलूं छु ! पुन्हा भेटू असेच केव्हा तरी-कुठे तरी !' □

दिल्ली वार्तापत्र : क्रमांक चार



# देशासमोरील आव्हाने आणि इंदिरा गांधी

**माणूस प्रतिनिधींनी घेतलेली मुलाखत**

शब्दांकन : कुमार केतकर

आम्ही पंधरा-वीस मिनिटे अगोदर पोचलो होतो. फाटक अर्धवट उघडे होते. बाहेर एक टॅक्सी, १–२ रिक्षा व दहा-पाच माणसे. आत १।२ पहारेकरी. आत गेल्यावर उजवी-डावीकडे एकेक पांढरे लहान तंबू. उजवीकडच्या तंबूत कचेरीसारखे काही काम चालत असावे. डावीकडचा तंबू भेटायला येणाऱ्यांसाठी. खरेही वाटेना, आपण इंदिरा गांधींच्या, एका माजी पंतप्रधानांच्या, नेहरूंच्या कन्येच्या निवासस्थानी आलेले आहोत! गेले ८।१० दिवस दिल्लीतील आजीमाजी मंत्र्यांची, नेत्यांची घरे–बंगले पाहात होतो. ती प्रशस्त आवारे, डोळे सुखावणाऱ्या हिरवळी, सजावटी, कारंजी यांपैकी काहीच येथे दिसत नव्हते. बंगल्यासमोर एक हिरवा वर्तुळाकार व कडेला थोडी झाडी. एका झाडाखालीच एक पांढरी अँबेसेडर. बंगल्याचा रंगही साधा पांढरा. तोही उडालेला. डावीकडच्या तंबूत आम्ही थोडा वेळ वाट पाहिली व निरोप आल्यावर आत गेलो. खोलीतले दृश्यही बाहेरच्यासारखेच. झकपक नाही. श्रीमंतीचे प्रदर्शन नाही. एक सोफा, तीन–चार खुर्च्या. कोपऱ्यात एक टीपॉय. या टीपॉयवर आम्ही टेपरेकॉर्डर्स ठेवले व प्रश्नांचा कागद इंदिरा गांधींच्या हाती दिला. कसलेही प्रास्ताविक नाही, उपचार नाही. प्रश्नोत्तरांना सुरुवात.

आदल्याच दिवशी इंदिरा काँग्रेस पक्षाने चरणसिंगांना बिनशर्त पाठिंबा व्यक्त केलेला होता. राजकीय वर्तुळात यामुळे खळबळ माजली होती. हा ताजा संदर्भ लक्षात घेऊन, आम्ही विचारले होते....

**: समाजवादावर तुमचा विश्वास आहे. याउलट चौधरी चरणसिंग यांनी समाजवादी तत्त्वज्ञानाला कायम तुच्छ लेखले आहे, आधुनिक औद्योगिकरणाचा धिःकार केला आहे आणि 'नेहरूवादा'च्या मूळ भूमिकांवर प्रखर हल्ला चढविला आहे. असें असूनही तुमच्या पक्षाने त्यांना पाठिंबा दिला आहे–हे विचित्रच नाही का ?**

: राजकारण एखाद्या व्यक्तीवर चालत नसते. अर्थात एखादे व्यक्तिमत्त्वच खास आणि अद्वितीय असेल तर गोष्ट वेगळी. सध्याचे

मोरारजी देसाईंचे सरकार सरळ सरळ भांडवलदारधार्जिणे होते. इतकेच नव्हे, तर ते देशाला धर्मांधतेच्या व जातीयवादाच्या खायीत नेत होते. काहीही करून हे सरकार जाणे इष्ट होते आणि ते जावे म्हणून जनसंघ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना वगळून जे सरकार बनवतील त्यांना आम्ही पाठिंबा देणे स्वाभाविकच होते. याचा अर्थ असा नव्हे की, त्या सरकारच्या सर्व धोरणांना आमचा पाठिंबा राहील. आम्हाला तर अजून ठाऊकही नाही–त्यांची धोरणे काय असणार आहेत. जनता पक्षाने मागील निवडणुकीच्या वेळी कित्येक घोषणा केल्या होत्या; परंतु एकाही घोषणेला ते चिकटून राहिले नाहीत.

**: तुम्ही त्यांना पाठिंबा जाहीर करताना त्यांच्याबरोबर धोरणविषयक चर्चा केली नाही ?**

: त्यांची धोरणे काय असतील हे मी कसे सांगू शकणार ?. मला खरोखरच त्याची कल्पना नाही. सरकार प्रत्यक्ष कामकाज सुरू करे-पर्यंत मी कसे सांगू शकणार ? आम्ही तशी चर्चा केलेली नाही.

**: परंतु चौ. चरणसिंगांचे विचार निश्चित आहेत आणि सर्वज्ञात आहेत.**

: प्रत्येकजणच म्हणत असे की, आपले विचार आणि भूमिका निश्चित आहेत; पण त्या सर्वांचे विचार व भूमिका प्रत्यक्षात निश्चित राहिल्या आहेत असे मला आढळत नाही. कोणीच आपल्या भूमिकेला चिकटून राहिलेले नाही.

(आमचा पुढचा प्रश्न पहिल्याशी जोडलेला; पण अधिक व्यापक स्वरूपाचा होता. काही दिवसांपूर्वी इंदिरा गांधींनी आपल्या अनुयायांना असा सल्ला दिला होता की, केवळ अल्पसंख्य व मागासलेल्या विभागांचा पाठिंबा पुरेसा नाही. इंदिरा काँग्रेस पक्षाने मध्यमवर्गाचा पाठिंबाही मिळवला पाहिजे. मध्यमवर्गाने पूर्वी फार महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे, वगैरे. प्रश्न असा, की हा वर्ग केव्हा आणि कोणाकडे आकर्षित होतो ? जेव्हा राजकारणाला काही तत्त्वांची बैठक असते, मूल्यांचा आधार असतो, ध्येयवाद असतो तेव्हाच हा वर्ग राजकारणात ओढला जातो. एरवी तो उदासीन राहतो आणि सध्या तर नेमकी याउलट स्थिती आहे. संधिसाधू राजकारणाला, हीन, वैयक्तिक सत्तास्पर्धेला नुसता ऊत आलेला आहे. चरणसिंगांना पाठिंबा देऊन इंदिरा गांधींच्या पक्षानेही दाखवून दिले होते, की त्यांचाही पक्ष यापैकीच एक आहे. म्हणून आम्ही विचारले–)

**: तुम्हाला अल्पसंख्यांक आणि गरीब जनतेमध्ये पाठिंबा आहे. राष्ट्रीय चळवळीतील मध्यमवर्गाच्या कार्याबद्दलही तुम्ही चांगले उद्‌गार काढत असता, त्यावरून तुम्हाला त्यांच्या पाठिंब्याचे महत्त्व वाटते असे दिसते; परंतु तुमच्या ह्या संधिसाधू राजकारणामुळे त्यांचा पाठिंबा मिळेल, असे खरोखरी तुम्हाला वाटते का ?**

: हा दुष्ट प्रश्न आहे. ( This is a vicious question.) आम्ही कोणत्याही प्रकारचे संधिसाधू राजकारण करीत नाहीं आहोत आणि कधी केलेलेही नाही. मध्यमवर्गाचे महत्त्व आम्ही केव्हापासूनच जाणून आहोत. राष्ट्रीय चळवळीत तर तो आघाडीवर होता. आज तो वाढत्या बेकारी आणि महागाईमुळे भरडला जात आहे. कोणत्याही परिस्थितीचे अचूक मापन करून विवरण करणे ( आणि त्यानुसार धोरण ठरविणे ) हे राजकीय पुढाऱ्यांचे काम असते. आम्ही तेच करीत आहोत.

**: तुमचा हा ( चरणसिंगांना दिलेला ) पाठिंबा कोणत्याही तत्त्वांवर आधारलेला नाही असे काहींना वाटते म्हणून हा प्रश्न विचारला. म्हणून आम्ही त्याला संधिसाधू युती असे म्हटले.**

: कोणती युती ? कुणी तत्त्वहीन युती केली आहे ? आम्ही कोणाशाही युती केलेली नाही. तेव्हा तत्त्वहीनतेचा प्रश्नच कुठे येतो ? किंबहुना त्यांनाही कुणालाच आमच्याशी युती नको आहे अन् तसे त्या सर्वांनी जाहीर व स्पष्टपणे म्हटले आहे.

**: त्यांनी बाहेर राहून पाठिंबा मागितला आहे !**

: त्यांनी बाहेरून पाठिंबा मागितला आहे हे खरे आहे.आमच्यासमोर मोरारजी देसाईंचे सरकार हवे का नको एवढाच प्रश्न होता. आम्हाला अर्थातच दुसरे सरकार हवे आहे. मग ते सरकार कुठचेही असो–जोपर्यंत त्यात जनसंघ व रा. स्व. संघ नाही, कारण आपल्या देशाला तो सर्वांत मोठा धोका आहे. १९४७ च्या भारत–पाकिस्तान फाळणीच्या वेळी जे दंगेधोपे झाले त्यातील संघाची ' कामगिरी ' मी पाहिली आहे आणि तेव्हापासून मी, केवळ मीच–अविरतपणे, क्षणाचीही उसंत न घेता त्यांच्याशी लढा देत आले आहे.

**: पण बाहेरून पाठिंबा देताना, राष्ट्रीय धोरणासंबंधात तुम्ही काही अटी घातल्याचे प्रसिद्ध झाले आहे.**

: ते निखालस खोटे आहे. आम्ही कोणत्याही अटी घातलेल्या नाहीत. व्यक्तिशः माझ्याबद्दल किंवा माझ्या पक्षाबद्दल. मला काय किंवा माझ्या पक्षाला काय, कोणतीही सवलत नको आहे. आम्ही फक्त काही प्रश्न उपस्थित केले. उदाहरणार्थ, हरिजन व अल्पसंख्यांकांबाबतचा दृष्टिकोन, भाषासंबंधीचा प्रश्न वगैरे. सार्वजनिक जीवनात आल्यापासून माझी मूल्ये अथवा विचार तसूभरही बदललेले नाहीत. इतरांनी मात्र बदलले.

**: सध्याची अस्थिरता काहींनी पक्षांतर केल्याने निर्माण झाली आहे आणि यात कशाला वैचारिक पाया असेल असे वाटत नाही. म्हणून पक्षांतरविरोधी विधेयक ताबडतोब संसदेपुढे यावे असे काही जणांचे मत आहे. तुमचा तशा विधेयकास पाठिंबा राहील काय ?**

: आम्ही तर तसे विधेयक आणलेही होते; परंतु त्यावेळच्या विरोधी पक्षांना ते रुचले नाही. नंतर जनता पक्षाने म्हटले, की हे विधेयक आम्ही मांडून संमत करून घेणार आहोत; पण त्यांनीही तसे केले नाही.

: हो. त्यांच्याच पक्षात त्या विधेयकाला विरोध झाला होता.

: इतक्या मोठ्या प्रमाणावरती पक्षांतर यापूर्वी कधी झालेले नाही. अगदी राज्यस्तरावरही नाही. मला वाटतं, मध्यप्रदेश का हरियाना, इथे कुठे तरी हा पक्षांतराचा पायंडा पडला. आता तर हा बाजारच मांडला गेला आहे.

**: असे विधेयक पुनः संसदेसमोर आले तर तुम्ही त्याला पाठिंबा द्याल का ? कारण हा धोका पुढेही उद्भवेल !**

: याबद्दल मला निश्चित विधान आत्ता करता येणार नाही. अशा तऱ्हेचा कायदा व संसद सदस्यांचे व्यक्तिगत स्वातंत्र्य, यांची सांगड कशी घालावयाची असाही प्रश्न त्यात आहे. उदाहरणार्थ, कधीकधी एखाद्या व्यक्तीची मतं खरोखरच मनापासून बदलतात तर काही वेळेला असेही होते, की व्यक्तीची मते बदलत नाहीत पण त्याचा पक्ष मात्र आपली भूमिका बदलतो. समजा, काँग्रेसनेच उद्या जनसंघाला पाठिंबा द्यायचे ठरविले तर काँग्रेस सदस्याच्या मनात त्याबाबत प्रश्न उद्भवणे स्वाभाविक आहे. त्याने त्या पक्षात मग राहावे का ? आता हेच पहा. माझ्या घोषणा व माझा फोटो यांचा सर्रास वापर करून महाराष्ट्रात काँग्रेस निवडून आली. तीच काँग्रेस आता मला सोडून गेली आहे ! याला काय म्हणावे ? एखादा सरधोपट नियम आणला तर त्यामुळे व्यक्तीचे मूलभूत स्वातंत्र्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे असे विधेयक जर आले तर त्याच्या सर्व कलमांचा अभ्यास करूनच त्याला पाठिंबा द्यावयाचा की नाही हे ठरवावे लागेल. संसदसदस्यांना एखाद्या प्रश्नावर आपल्या विचारास अनुसरून मत देण्याचे स्वातंत्र्य असावे. आम्ही आमच्या पक्षात असे स्वातंत्र्य पुष्कळ वेळा दिले आहे.

**: बोनससंबंधातील तुमचे विचार स्पष्ट करू शकाल काय ?**

: त्याबद्दलचे तपशीलावर विचार मांडण्यास आत्ता मी तयार नाही. कारण समग्र आर्थिक धोरणाचा तो एक भाग आहे. मोरारजी सरकार मोठ्या औदार्याने कुणाच्याही मागण्या देत सुटले आणि जेव्हा देण्याचा प्रश्न येतो तेव्हा एकाला देईन व दुसऱ्याला देणार नाही असे करणे कठिण असते. तेव्हा मी याबाबत आणखी मतप्रदर्शन करू इच्छीत नाही.

**: तरी पण बोनसबाबतचे सर्वसाधारण मत सांगाच.**

: मला असं वाटतं की, बोनस उत्पादकतेशी वा तत्सम काही गोष्टींशी संलग्न असावा. म्हणजे कामगारांना त्यांच्या व्यवहारात अधिक रस वाटेल.

**प्र. : पण खरे वेतन हे बाजारातील किंमतीच्या नेहमीच मागे राहिले आहे.**

: आताच्या घटकेला खरे आहे; पण माझ्या कारकीर्दीत किंमती खाली आल्या होत्या आणि चलनवाढीतही घट झाली होती. तरीही कामगार माझ्यावर रागावले होते. मी कामगारविरोधी आहे असे ते म्हणत होते.

**प्र. : वेतनाच्या रचनेमध्ये विलक्षण विषमता आहे. उदा० काही सरकारी उद्योगातही २० टक्क्यांइतका बोनस दिला जातो.**

: म्हणूनच मी म्हणते की तो समग्र आर्थिक धोरणाचा प्रश्न आहे. आता इतकी चलनवाढ असण्याचे कारणच काय ? मोरारजी सरकार राज्यावर आले तेव्हा धान्यसाठ्याचा तुटवडा नव्हता, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई नव्हती आणि परकीय चलनाचा साठाही पुरेसा होता. तरीही किंमती का वर गेल्या ? कारण अतिशय चुकीचे आर्थिक धोरण. मूलभूत धोरणात सुधारणा केल्याशिवाय अशा तात्पुरत्या उपाययोजनांचा काय उपयोग ? मोरारजी सरकारचे निर्णय चुकीचे आहेत असे मी म्हणते. कारण ते राष्ट्रहित डोळ्यांसमोर ठेवून घेतलेले नाहीत किंवा ज्या विभागाचा फायदा अभिप्रेत होता त्यांचेही हित दृष्टीसमोर ठेवलेले नाही. तत्कालिन गैरसोयी वा पेच सोडवण्यासाठी घेतलेले ते निर्णय होते. लांब टप्प्याच्या वाटचालीच्या दृष्टीने हे धोक्याचे आहे.

**प्र : परंतु तुमच्या पक्षाने व तुमच्या इंटकनेही बोनसच्या मागणीचा लोकसभेत व बाहेरही पुरस्कार केला आहे.**

: होय, ते खरेच आहे.

**प्र. : म्हणजे तुम्हालाही तशीच भूमिका घेणे भाग पडेल. लोकांचीही तशीच अपेक्षा राहील.**

: अं हं, मी म्हटल्याप्रमाणे तो समग्र आर्थिक धोरणाचाच भाग आहे आणि तसाच त्याचा विचार करावा लागेल. तात्पुरत्या उपाययोजना करण्यावर माझा विश्वास नाही.

**प्र. : 'इस्लामिक बॉंब'ची निर्मिती भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक गोष्ट आहे असे काही वर्तुळात म्हटले जाते. कोणत्याही प्रकारच्या आण्विक सज्जतेची सूचना तुम्ही कराल काय ? आणि तसा कार्यक्रम घेतल्याने राष्ट्रीय विकासात बाधा येऊ शकते काय ?**

: आपण अण्वस्त्र तयार करून केवळ हा धोका कमी होईल असे वाटत नाही. पाकिस्तान, चीन वा आपण या क्षेत्रात कोणत्या पातळीपर्यन्त जाऊ शकू यालाही काही मर्यादा आहेत. या राष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध राखणे हाच योग्य मार्ग आहे आणि अर्थातच सर्वसाधारण सुसज्जता व जागरूकता आवश्यकच आहे.

**प्र. : मोरारजी सरकारचे धोरण, शांततामय विनियोगासाठी सुद्धा अणुस्फोट करावयाचा नाही, असे होते !**

: मी अर्थातच या धोरणाशी सहमत नाही. असे प्रयोग करणे हे आमचे धोरण होते. कारण आपल्या शास्त्रज्ञांना या व इतर क्षेत्रात अत्याधुनिक तंत्राचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**प्र. : चीनमध्ये दारिद्र्याचे निर्मूलन करण्यात आले आहे असे त्या देशात जाऊन आलेले लोक म्हणतात. अणुबॉंबही त्यांनी यशस्वी रीतीने बनविला आहे. आपल्याकडे ह्या दोन्ही गोष्टी एकाच वेळी का जमू शकल्या नाहीत ?**

: या लोकांच्या मताशी मी सहमत नाही. काही वर्षांपूर्वी चीनबद्दल विलक्षण हवा तयार झाली होती. त्या वेळी असं सांगण्यात येत होतं की, चीननं सर्व क्षेत्रात अफाट प्रगती केली आहे — औद्योगिक क्षेत्रात, शेती वा एकूणच आर्थिक क्षेत्रात ते फार पुढे

गेले आहेत असे म्हटले जात असे. ही सर्व वक्तव्ये निराधार असत्याचे आता सिद्ध झाले आहे. किंबहुना आपल्या उद्योगधंद्याची उभारणी करण्यासाठी ते पाश्चिमात्य राष्ट्रांवरती अवलंबून असल्याचे दिसते.

**: पण निदान दारिद्र्यनिर्मूलन झाले आहे, विषमता कमी झाली आहे......**

: मला तसे वाटत नाही. आणि तसा पुरावाही उपलब्ध नाही. जर ते यशस्वी झाले आहेत तर त्यांच्या मोठ्या शहरात दंगे का झाले असते ? अनेक शहरात दंगे झाल्याचे वृत्त आहे.

ज्या काही प्रमाणात त्यांना यश मिळाल्याचे दिसते त्याचे प्रमुख कारण तेथील जीवनावरील कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव. उदाहरणार्थ, जेव्हा शहरात नोकऱ्या मिळेनाशा झाल्या तेव्हा त्यांनी तेथील युवकांना जबरदस्तीने खेड्यांमध्ये जावयास भाग पाडले आणि अगदी कमी वेतनावर काम करण्याची सक्ती केली. किंबहुना मला असं वाटतं, आपण खूपच प्रगती केली आहे आणि लक्षणीय प्रमाणात दारिद्र्याचंही उच्चाटन केलं आहे. याचा अर्थ तेथील लोक दारिद्र्यरेषेच्या वर गेले नसतील असे मला म्हणावयाचे नाही. १९६६ साली मी जेव्हा अधिकारसूत्रे घेतली, तेव्हा जी परिस्थिती होती ती आता तुम्हाला भारतात दिसते का ? आर्थिक व्यवस्थेचे सर्व लगाम जर तुमच्या हाती असतील तर अनेक गोष्टी करणे सोपे जाते. चीनमध्ये तसे घडले. आपल्याकडे तसे नसतानासुद्धा जेव्हा आणीबाणी आली – त्याविरुद्ध केवढा आरडाओरडा होतो आहे ! इतके चौकशी आयोग नेमले गेले; पण अतिरेकाची एकही गोष्ट झाली असे सिद्ध झाले नाही ! याउलट १९७७ नंतर किती अतिरेक होत आहेत ते सर्वांना दिसतच आहेत.

**प्र. : चार वर्षांपूर्वी तुम्ही तुमच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांमध्ये चीनसंबंधीचा एक लेख वाचावयास दिला होता. त्या लेखात चीनमधील प्रयत्नांचा परामर्ष घेण्यात आला होता. तुम्ही माओच्या विचारात व लढ्यात विशेष रस घेतला होता.**

: चीनमध्ये होणाऱ्या प्रयोगात मला नेहमीच रस वाटत आला आहे; परंतु याचा अर्थ असा नव्हे की, तो मार्ग आपल्याला पूर्णत: किंवा भागश: अवलंबिता येईल. आपल्या देशातील परिस्थितीला जे अनुरूप होईल ते घेण्यास काहीच हरकत नाही. मग चीनच काय, कुठल्याही राष्ट्राकडून ते घ्यावे. जितके सांगितले जात होते तितके नेत्रदीपक यश चीनने मिळवले नव्हते, हे अधिक खोल अभ्यासाने आमच्या लक्षात आले. आता तर तेथे अस्थिरतेचीच परिस्थिती दिसते. जर मागची दोन वर्षे जनता सरकारच्या राज्यात वाया गेली नसती तर आपलीही आणखी प्रगती होऊ शकली असती. वर्ल्ड बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी आपल्या प्रगतीची नोंद घेतलेली होती.

**: जागतिक बँकेने दिलेले प्रशस्तिपत्र कित्येकदा विपरीत उद्दिष्टांनी दिलेले असते. अशा आंतरराष्ट्रीय संस्थांचे अभिप्राय नेहमीच संशयाने पाहावयाचे असतात.**

अर्थातच. हे सत्यच आहे. ते आमच्या बाजूने नव्हते. इतकेच नव्हे, तर माझ्या तर ते व्यक्तिश: विरुद्धच होते; पण मुद्दा असा आहे की, इतके असूनही त्यांना ही गोष्ट कबूल करावी लागली.

(दोन दिवसांपूर्वीच इंदिरा गांधींचे एके काळचे सहकारी, प्रिन्सिपल प्रायव्हेट सेक्रेटरी पी. एन्. हक्सर यांची आम्ही भेट घेतली होती. ७३ नंतर ते नियोजन मंडळाचे उपाध्यक्षही होते. नेहरू कुटुंबाचे ते जुने मित्र व हितचिंतक. आणीबाणीकाळात त्यांचा अवमान झाला व आज त्यांचे व इंदिरा गांधींचे संबंध तणावाचे आहेत. त्यांनी बोलताना सांगितले होते, 'इंदिरा गांधी मूलगामी विचार करत नाहीत. त्यांना नेहरूंसारखी तत्त्वचिंतनाची बैठक नाही. त्या संघटनाही बांधीत नाहीत आणि आर्थिक राजकीय प्रश्न तर अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करीत आहेत.' म्हणून चीनबद्दलचा प्रश्न आम्ही विचारला होता. तो विषय आणखी एका पद्धतीने पुढे न्यावा असे आम्हाला वाटले. म्हणून आमचा पुढचा प्रश्न....)

**: सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी लोकांना आवाहन करावयाचे, त्यांना उद्दीपित करावयाचे; पण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मात्र नोकरशाहीवर विसंबायचे, ही तुमची पद्धत दिसते. आम्हाला असे दिसते की, तुम्ही लोकांच्या शिस्तबद्ध संघटना बांधण्याचे सातत्याने टाळलेच आहे. तुमच्या ध्येयाची पूर्ती या पद्धतीने होणार नाही, असे तुम्हाला नाही वाटत ?**

: 'शिस्तबद्ध संघटना' म्हणजे काय ? कम्युनिस्ट वा जातीयवादी रा. स्व. संघ सोडल्यास आमची काँग्रेस संघटना ही सर्वांत अधिक शिस्तशील आहे.

**: पण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी, उदा० तुमचा वीस कलमी कार्यक्रम, कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे.**

: वीस कलमी कार्यक्रम हा सरकारचा कार्यक्रम होता. लोकांनी स्वत: अंमलबजावणी करावी अशी त्याची सर्व कलमे नव्हती. उदा० बसेस, ट्रक्सना परवाना देणे, पाटबंधारे बांधणे या सरकारने करावयाच्या गोष्टी आहेत. जे लोकांनी करण्यासारखे होते, ते सर्वच ठिकाणी घडू शकले नाही. काही ठिकाणी– उदा० केरळमध्ये कार्यकर्त्यांनी पुढाकार जरूर घेतला होता. इतर राज्यात तसे झाले नाही. तशा अंमलबजावणीसाठी कार्यकर्त्यांची (शिस्तबद्ध) संघटना असायला हवी हे मला मान्य आहे. (I am entirely with you). आमच्या पक्षाचं कसं आहे की, निरनिराळ्या विचारांच्या सामान्य लोकांचा आमच्या पक्षाला आधार आहे. आमच्या कार्यक्रमावर खरी निष्ठा नसलेले सुद्धा अनेकजण आमच्यात आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांची शिस्तबद्ध संघटना आमच्या पक्षातून उभी राहणे जरा कठिणच आहे. त्यामुळे माझ्या पद्धतीने पुढे जाणे अधिक शक्य कोटीतील वाटते. जे काही आपण मिळविले आहे ते भक्कम करावे आणि पुढले पाऊल उचलावे. कार्यकर्त्यांचा छोटासा संच जवळ असल्याने हे साधता येईल असे वाटत नाही. त्यामुळे समग्र जनतेच्या प्रश्नांचे भान सुटण्याची

शक्यता असते. कम्युनिस्ट पक्षाच्या बाबत असे घडल्याचे आपण पाहतो. त्यांच्याकडे संच आहे; पण सबंध जनतेच्या प्रश्नांशी त्यांचा संपर्क असल्याचे दिसत नाही. सर्व जनतेशी घनिष्ट संबंध असलेले कार्यकर्ते असणे हे सर्वात उत्तम; पण असे कार्यकर्ते पुरेशा संख्येत मिळवणे कठिण आहे.

**प्र. : कम्युनिस्टांबद्दल तुम्ही असे कसे म्हणता ? चौ. चरणसिंगांच्या प्रचंड 'किसान सम्मेलना'नंतर थोड्याच दिवसात तीन लाख शेतमजुरांचा मोर्चा त्यांनी दिल्लीत आणला होता.**

: मोठा मोर्चा आणण्याचे यश कोणीही संपादन करू शकते. त्या मोर्चातील अर्धे लोक नंतर माझ्याकडे आले आणि म्हणाले की, आमचा तुम्हालाच पाठिंबा आहे!

**: ते जरी खरे असले तरी त्यांनी एवढ्या लोकांना संघटित केले हे खरे ना ?**

: सरकारने जर आम्हाला अडथळे निर्माण केले नाहीत तर आम्ही सुद्धा यापेक्षा जास्त लोकांचा मोर्चा संघटित करू शकू. ते काही कठिण नाही. आमच्या येथील मोर्चाने खूप लोक प्रभावित झाले होते आणि दुसरे म्हणजे कम्युनिस्ट पक्षाचा मोर्चा तीन लाखांचा नव्हता. जास्तीत जास्त ते एक लाख होते. शिवाय त्यातील कित्येकजण विनातिकिट आले होते आणि कित्येकांना कशासाठी दिल्लीस आणले होते हे सुद्धा ठाऊक नव्हते ! आमच्या मोर्चाच्या वेळेस मात्र गाड्या, बसेस, ट्रॅफिक बंद करण्यात आला व लोकांना येऊ दिले नाही. नाही तर आम्ही दहा लाखांचा मोर्चा सुद्धा संघटित करू शकलो असतो ! आमच्या मोर्चास व सभेस जे निरीक्षक सी. पी. आय., सी. पी. एम्., बी. एल्. डी. ने पाठविले होते ते सुद्धा आमच्या मोर्चाने प्रभावित झाले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आमचा मेळावा हा निष्ठाबद्ध कार्यकर्त्यांचाच होता, ही गोष्ट त्या पक्षाच्या पुढाऱ्यांनी मला खाजगीत सांगितली. जाहीरपणे ते यापेक्षा काही वेगळे म्हणालेही असतील. आमच्यासारखा मोर्चा त्यांना जमला नसता असेही ते म्हणाले.

**प्र. : कोणत्याही कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सामान्य लोक व नोकरशाही यांच्यामध्ये कार्यकर्त्यांची एक फळी असावी लागते असे आम्हास वाटते.**

: हो. पण काँग्रेस हेच करत आली आहे. नाही तर इतके बदल घडवून आणणे आम्हाला शक्य झाले नसते. हरिजनांमध्ये जी नवीन उमेद तयार झाली आहे ती काय नोकरशाहीने आणली आहे ? काँग्रेस पक्ष त्या हरिजनांमध्ये आहे म्हणूनच ते शक्य झाले.

**: पण निव्वळ उमेद निर्माण करून प्रश्न कसे सुटणार ?**

: माझी पद्धत निराळीच आहे. अशी उमेद तयार होणे फार महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ मुस्लिमांचाच प्रश्न घ्या. १९५५ का १९५७ च्या सुमाराला, मला काँग्रेस वर्किंग कमिटीच्या वतीने आसाममध्ये निवडणुकीची सूत्रे हातात घेण्यास सांगण्यात आले. त्या वेळेस श्री. मेधी मुख्यमंत्री होते. आमच्या लोकांचे म्हणणे, त्यांना बदलावे, असे होते. तरुण व्यक्तीला त्यांची जागा मिळावी, संसदेतील तरुण खासदारांना आसामात परत बोलवावे व विधानसभेतील वयस्कर सदस्यांना लोकसभेत पाठवावे, असे त्यांचे सांगणे होते. परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर मलाही त्यांचे म्हणणे पटले. कारण नाही तर पक्षात बंडाळी माजली असती आणि निवडणूक आम्ही जिंकू शकलो नसतो. ज्येष्ठता आणि कुवत या दृष्टीने विचार करता त्या वेळचे अर्थमंत्री श्री. फक्रुद्दिन अली अहमद यांचेच त्या पदासाठी नाव योग्य होईल, असे काहींनी मला सुचविले; पण इतरांचे असे म्हणणे पडले की ते तर मुस्लिम आहेत आणि हिंदू बहुसंख्य असलेल्या राज्यात मुस्लिम मुख्यमंत्री कसा नेमायचा ? हे ऐकून मला धक्काच बसला. कारण एका बाजूने आम्ही धर्मनिरपेक्षतेच्या गोष्टी करतो आणि हे लोक तर मुस्लिम व्यक्तीस, योग्य असूनही, मुख्यमंत्री करावयास तयार नव्हते. मी कशा परिस्थितीत आणि कसं काम केलं याची खूप लोकांना कल्पना नाही; पण माझ्या प्रयत्नामुळे मी असे वातावरण निर्माण करू शकले की, ज्यामुळे पुढे सहा राज्यांचे मुख्यमंत्री मुस्लिम होते आणि दोन राष्ट्रपतीही; आणि त्यात कोणाला वावगेही वाटले नाही. तेव्हा हा प्रश्न, लोकांमध्ये एक विशिष्ट वातावरण निर्माण करण्याचा आहे. अशा वातावरणात चांगले बदल स्वीकारण्यास लोक उद्युक्त होतात.

जनता पक्षाचे राज्य गेले, ही गोष्ट कशामुळे घडली असे तुम्हाला वाटते ? केवळ काही लोकांच्या पक्षांतरामुळे ? का मी गेले दोन वर्षे दिलेल्या लढ्यांमुळे ? जनता पक्षाच्याच लोकांना हे कबूल करावे लागले, की ते कार्यक्षम सरकार देऊ शकले नाहीत. जनसंघाबरोबर आपण जाऊ शकत नाही हेही त्यांनाच कबूल करावे लागले.

**प्र. : पण त्यांनी तर आपणहूनच पक्षांतर केले...तुम्ही तर स्वच्छच म्हणाला होता की, मी हे सरकार पाडायचा प्रयत्न करणार नाही.**

: प्रश्न सरकार पाडण्याचा नव्हता. ज्या चुकीच्या धोरणांचा अवलंब सुरू झाला होता त्या धोरणांना विरोध करण्याचा प्रश्न होता. असे विरोधाचे वातावरण आम्ही निश्चितच तयार केले आणि आमच्या म्हणण्यानुसार जनसंघ ही त्यातील कळीची बाब होती. मुस्लिम व हरिजनांच्या प्रश्नाबाबत विचार करता, देशाची एकात्मता, एकजूट व स्थैर्य राखण्याच्या दृष्टिकोनातून हे करणे (म्हणजे जनसंघ जाणे) आवश्यकच होते. आम्ही त्याप्रमाणे धोरण आखले. तुम्ही लोक फार वरवरचा विचार करता. असाने गोष्टी साधत नसतात. तेच लोक तेव्हासुद्धा सांगत, की दहा लाख निर्वासितांचे ओझे – बांगला देशच्या वेळचे – त्यांना झेपले नसते. सर्व व्यवस्थाच कोलमडून पडली असती.

(पुनः एकदा आम्ही विषयाकडे वळू पाहतो...)

**प्र. : अर्थपूर्ण सामाजिक आणि राजकीय बदल घडवून आणण्यासाठी योग्य साधने घडविण्याची आज गरज आहे असे आमच्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रात तुम्ही म्हटले आहे. 'योग्य साधने' म्हणजे काय ? कोणते अर्थपूर्ण परिवर्तन तुम्हाला अभिप्रेत आहे ?**

: 'योग्य साधने' म्हणजे अर्थातच पक्ष, नोकरशाही आणि सर्वसाधारण लोकमत.

**प्र. : पण त्याला काही वैचारिक पाया असावा. उदा० राष्ट्रीय चळवळीची परंपरा, समाजवादाची विचारसरणी–असा पक्ष–**

उ. : एक गोष्ट म्हणजे संपूर्ण तरुण पिढी स्वातंत्र्यानंतर जन्माला आली आहे. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीची मूल्ये जोपासावी याबद्दल कुणाचेच दुमत नाही. काँग्रेस हा तशी विचारसरणी केंद्रभूत मानणाराच पक्ष आहे.

**प्र. : आम्ही ते अमान्य करीत नाही; पण प्रत्यक्ष व्यवहारात काँग्रेसची प्रतिमा वेगळीच उमटते. खेड्यांमध्ये जमीनदार पुष्कळदा काँग्रेसचा पुढारी म्हणून वावरतो आणि गरीब शेतकरी किंवा शेतमजूर यांना तुमच्याबरोबर यावयाची इच्छा असते. तो जमीनदार त्याला जवळ कसे करील ?**

उ. : पण दुर्दैव असे की, जर जमीनदारांचा तुम्हाला पाठिंबा नसेल तर ते शेतमजुराला धाकदपटशा दाखवतात. परिणामतः शेतमजुराला मतही देता येत नाही किंवा इतर गोष्टीही त्यामुळे ते करू शकत नाहीत. तेव्हा तुम्हाला शेतमजुरांसाठी काही करायचे असेल तर जमीनदाराला शत्रुपक्षात ढकलून केवळ ते जमेल असे मला वाटत नाही. तुम्हाला घोषणा द्यायच्या आहेत की काही उद्दिष्टे साध्य करायची आहेत, असा तो प्रश्न आहे. कधीकधी संघर्ष अटळ असतो. त्या वेळी तो टाळता कामा नये; पण जर असा संघर्ष टाळता येण्यासारखा असेल तर तसा प्रयत्न करायला हवा. गरीब जनतेला आम्ही काही प्रमाणात आत्मविश्वास आणि पाठिंबा मिळवून दिला आहे, त्यांची संख्याही मोठी आहे. तरीही जमीनदारांविरुद्ध लढा देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात अजून निर्माण झालेले नाही. उदा. आम्ही गरिबांसाठी पुष्कळ केले होते; पण श्रीमंत आणि आहे–रे वर्गाच्या प्रचाराला ते बळी पडले आणि आम्हाला मतेही मिळू शकली नाहीत.

**प्र. : प्रचारामुळे असे घडले हे तुमचे म्हणणे आहे काय ?**

उ. : निवडणुकीच्या काळात माझ्याबद्दल, माझ्या कुटुंबाबद्दल, कुटुंबनियोजनासारख्या कार्यक्रमाबद्दल नाना तऱ्हेच्या अफवा फैलावण्यात आल्या. त्याला सुशिक्षित लोकही बळी पडले. त्यांनाच त्या वेळी काय घडले याचे आकलन होत नाही असे ते म्हणतात. घटसर्प, धनुर्वात यांसारख्या संहारक रोगांविरुद्ध उपाययोजना म्हणून मुलांना लस टोचण्याचा कार्यक्रम होता; परंतु आम्ही त्या मुलांना निर्बीज करणार आहोत अशी अफवा उठवण्यात आली. कित्येक पालकांनी धावत जाऊन शाळेतून आपली मुले घरी परत नेली ! आज १९७९ सालीसुद्धा अशा लशीचा शोधही लागलेला नाही. ह्याची जाणीवही पुष्कळांना होती; पण प्रचाराचा प्रभाव इतका होता की, काय घडते आहे हेच त्यांना कळेनासे झाले होते.

**प्र. : तुम्ही म्हणता असा प्रचार झालाही असेल पण गरीब लोकांनी या प्रचारावर तात्पुरताच विश्वास ठेवलेला दिसतो. आजही तुम्हाला या वर्गाचा पाठिंबा असलेला दिसतो. हे एरव्ही कसे घडू शकले असते ?**

उ. : ते खरे आहे; पण तेव्हढ्याने प्रश्न सुटत नाही. अलीकडचीच गोष्ट घ्या. नुकतीच मी खांडव्याला निवडणुकीच्या प्रचारासाठी गेले होते. तो मुख्यतः आदिवासी विभाग होता. हवेत खूप उष्मा होता. त्यामुळे छोट्या शामियान्यात सभा घ्याव्या लागत. व्यक्तिशः मला अशा छोट्या सभा घेणे आवडते. कारण त्यामुळे लोकांच्या जिवंत प्रतिक्रिया लगेच समजतात. अशाच एका सभेत एक आदिवासी माणूस उठून उभा राहिला आणि म्हणाला– 'आमचा तुम्हाला पाठिंबा जरूर आहे आणि आम्ही तुम्हालाच मत देऊ इच्छितो. आज तुम्ही इथे आहात. उद्या तुम्ही गेल्यावर इथले श्रीमंत लोक आमची कातडी सोलतील त्याचे काय ? तुम्हाला ते नंतरच कळणार. तुम्ही येऊन त्यांना रोखू शकाल काय ? त्यामुळे आम्ही तुम्हाला मत देऊ शकू किंवा नाही हेही सांगता येत नाही !' ही परिस्थिती आजही अस्तित्वात आहे.

**प्र. : अडथळे आहेत हे मान्य. पण तरी तुम्हाला गरीबवर्गाची मते मिळतातच.**

उ. : ही गरिबांची भावना आहे हे खरं. म्हणून संघर्षाचे धोरण स्वीकारावं हे बरोबर नाही. संघर्षवादाची पद्धत कम्युनिस्टांची आहे. आमची गांधीवादी पद्धत तशी नाही. याचा अर्थ आम्ही संघर्षाला भितो असा नव्हे. तो जर अपरिहार्य असेल तर तो मी टाळणार नाही. भारताच्या प्रत्येक नागरिकाच्या बाजूने उभे रहाण्याच्या मताची मी आहे. असा काही प्रसंग आलाच तर सर्वात दुबळ्या वर्गाच्या बाजूने मी उभी राहीन; पण दुसऱ्याबरोबर कारणाशिवाय मी संघर्ष करणार नाही. जर तसा संघर्ष माझ्यावर लादलाच गेला तर मी त्यापासून पळून जाणार नाही; परंतु संघर्षवादी धोरणामुळे एखादा कार्यक्रम आपण भक्कमपणे अमलात आणू शकणार नाही. म्हणून मी कार्यक्रमात सर्वांना सामावून घेण्याचा प्रयत्न करते. याचा अर्थ निश्चितच असा नव्हे, की मी संघर्ष टाळते. त्यांचे मन वळविण्यावर माझा भर राहील. हे कसे करावे ? समाजवादावर कित्येक काँग्रेसवाल्यांचाच विश्वास नाही. असे असूनही ते मला पाठिंबा का देतात ? याचा अर्थ ते खरोखरी माझ्या बाजूचे आहेत असा नव्हे. त्यांना कळून चुकले आहे, की स्वतःचे अस्तित्व राखण्यासाठी मला पाठिंबा देण्याशिवाय गत्यंतरच नाही. त्यांना दुसरा पर्यायच रहाणार नाही, (समाजवादाला पाठिंबा दिल्याशिवाय) असे वातावरण तयार करणे हे माझे कार्य आहे. परराष्ट्रीय धोरणाचेच उदाहरण घ्या. तुम्हाला असे वाटते का, की जनता पक्षाची मी आखलेल्या धोरणावर श्रद्धा आहे ? पण निदान उघडपणे तरी ते त्या धोरणाला डावलू शकले नाहीत. कारण तसे होऊ शकणार नाही अशीच परिस्थिती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आम्ही तयार केली होती. तेव्हा प्रश्न असा येतो की तुम्हाला काही करायचे आहे की नुसतं यंव करू आणि त्यंव करू अशा वल्गना करायच्या आहेत ?

**प्र. : पण यासाठी कार्यकर्ते नकोत का ?**

उ. : तुमच्याशी माझा या बाबत मतभेद नाही. आम्हाला नक्कीच निष्ठाबद्ध कार्यकर्त्यांच्या सचाची जरुरी आहे. १९५९ साली तसा मी जाणीवपूर्वक प्रयत्न केलाही होता. मी त्या वेळी काँग्रेसची अध्यक्ष होते. प्रथमच आम्ही शंभर मुलामुलींना गांधीग्राम येथे प्रशिक्षण दिले. निरनिराळ्या भागातून आलेली ती मुले होती. ती मुलं नक्कीच निष्ठावान होती. ह्या प्रशिक्षणाच्या कामासाठी मी

एक लाख रुपये जमा केले होते. एका वर्षानंतर मी जेव्हा अध्यक्षपद सोडले व नवीन अध्यक्षाची नेमणूक झाली तेव्हा त्यांना ह्या कामाची गरज वाटली नाही. प्रशिक्षण केंद्र त्यांनी बंद केले व ते एक लाख रुपये त्यांनी दुसऱ्या फंडात घातले. खेड्यात काम करण्यासाठी आम्ही या मुलांना त्यांच्या कमीत कमी गरजा भागतील एव्हढे वेतनही देणार होतो. पुढे जेव्हा देवकांत बरुआ अध्यक्ष झाले तेव्हा त्यांनी एक प्रयत्न केला. काय केले ? तर अनेक Ph. D. झालेल्यांना आपल्या भोवती गोळा केले. मी त्यांना विचारले, ' ही Ph. D. मंडळी करणार आहेत तरी काय ? खेड्यात जाणार आहेत ? शहरातल्या निरनिराळ्या भागांत तरी जाऊ शकतील का ते ?' इथेच तर आपलं सगळ्यांचं अडतं.

**प्र. : पण आता तुम्ही परत तुमच्या पक्षाच्या अध्यक्षा आहात.**

उ. : अध्यक्षा आहे; पण आमच्याकडे खरोखरच काही पैसे नाहीत. जे काही आहेत ते तर पक्षाच्या रोजच्या कामासाठीच लागतात. नाही तर मधूनमधून येणाऱ्या निवडणुकीत ते खर्च होतात.

**: पण पैशाशिवाय काम करणारे तुम्हाला कुणी कसे मिळत नाहीत ?**

: दिवसेंदिवस आदर्शवादाने प्रेरित झालेले लोक मिळणे कठिण झाले आहे. आमच्याकडेही अशी काही तरुण मुलं आहेत; पण त्यांची संख्या मोठी नाही. जितकी असायला पाहिजे तितकी नाही; पण काही अडचणी मी तुम्हाला सांगते. कधीकधी काय होतं की, ही तरुण मुलं एखाद्या ठिकाणी काही काम करायला गेली की, तेथील प्रस्थापित पुढारी आरडाओरडा करू लागतात. हा इथे कशाला आला-याला आमदार वगैरे व्हायचं आहे की काय ? आणि मग त्या तरुण कार्यकर्त्याला असं वाटू लागतं की, कोणत्या तरी गटाशी जोडून घेतल्याखेरीज निभणार नाही आणि अशा प्रकारे तो गटबाजीत ओढला जातो. अशाच प्रकारचा निष्कारण आरडाओरडा युवक कॉंग्रेसबद्दलही करण्यात आला होता. वास्तविक बारुआंना विचारल्याशिवाय यूथ कॉंग्रेसने एकही गोष्ट केलेली नव्हती. आम्हीच त्यांना पाच कलमी कार्यक्रम दिला होता. बारुआंनीच तर त्यांना परवानगी दिली, पैसे दिले; पण जेव्हा युवक कॉंग्रेसचे कार्यकर्ते स्वतंत्रपणे, कोणत्याही गटात सामील न होता, कार्यक्षमतेने काम करू लागले तेव्हा ते त्यांच्या विरुद्ध जाऊ लागले आणि मग असा प्रचार करण्यात येऊ लागला की, यूथ कॉंग्रेसच्या लोकांना निवडणुकीत सर्व तिकिटे हवी आहेत. अंबिका सोनीने केलेले तिकिटासंबंधीचे मूर्खपणाचे विधान-की त्यांना काही शे-दोनशे तिकिटे हवी आहेत-सोडल्यास त्यातील बहुतेकांना तर आमदार व्हायचीसुद्धा इच्छा नव्हती. त्यांनी फक्त दहा नावांचीच मागणी केली होती आणि या दहा नावांपैकी एक नाव तुमच्या शरद पवारांचे होते ! आणि आम्ही तर तीन-चारच नावे मान्य केली होती. प्रचार अशा प्रकारे करण्यात आला की, जणू कॉंग्रेस व युवक कॉंग्रेस हे एकमेकांचे प्रतिस्पर्धीच आहेत. आता तर हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. उफाळून आलेल्या जातीयवादामुळे या प्रश्नाला वेगळेच वळण लागले आहे-विशेषत: बिहार आणि उत्तर प्रदेशात पुढारलेल्या जाती, मागासलेल्या जाती, जणू यादवी युद्धच चालू आहे.

**प्र. : तुम्ही कार्यकर्त्यांच्या संघटना बांधण्याबाबत सांगत होता. देशात दोनच संघटना अशा आहेत की, ज्यांच्याकडे कार्यकर्त्यांचा संच आहे. रा. स्व. संघ व कम्युनिस्ट आणि तुम्ही तर दोघांनाही शत्रुस्थानी मानता असे दिसते.**

उ. : त्यांच्यात फक्त मार्क्सवादी पक्षाने कार्यकर्त्यांचा संच उभा केला आहे. रा. स्व. संघाच्या कामाची पद्धत वेगळी आहे. ज्याप्रमाणे त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांकडे 'पाहिले' तसे आम्ही आमच्या कार्यकर्त्यांकडे 'लक्ष' दिले नाही. उदाहरणार्थ, जेव्हा आमचे सरकार होते तेव्हा ते जरी कॉंग्रेसचे असले तरी सर्वांसाठी आहे असे मानून आम्ही चालत होतो. त्यामुळे नोकऱ्या देताना वगैरे एखादी व्यक्ती कॉंग्रेसची आहे की नाही, हे पाहिले जात नसे; परंतु रा. स्व. संघाचे तसे नाही. कधीकधी असेही घडले आहे की, मुलाखतीस आलेल्या उमेदवारास त्याचे जनसंघाबद्दलचे मत विचारले जाते. जनसंघाचे व त्याचे संबंध असल्यास त्याला अधिक योग्य माणसापेक्षाही प्राधान्य दिले जाते. अशा प्रकारेसुद्धा पाठिंबा तयार करता येतो. आम्ही असे केले नाही. दिल्ली महानिगर निगममध्ये जनसंघाचा कारभार होता तेव्हा त्यांनी त्यांची माणसे महत्त्वाच्या पदांवर पेरली; पण आम्ही बहुमतात आल्यावर आम्ही त्यांना कामावरून कमी केले नाही. याउलट जनता पक्षाने राज्यावर आल्याबरोबर, आम्ही केलेल्या नेमणुका रद्द ठरवल्या.

**: अशा प्रकारे शिरकाव करून प्रभाव वाढविणे हा रा. स्व. संघाच्या कार्यपद्धतीचा गाभा नाही, असे आम्हाला वाटते.**

: नाही कसा ? कळीच्या जागा मिळवून, वेळप्रसंगी नाकेबंदी करता यावी अशा पद्धतीने त्यांनी शिरकाव केला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचे प्रचारयंत्र. त्यांच्या प्रचारयंत्रणेत लहान व्यापारी, दुकानदार, पानवाला असे लोक प्रमुख भूमिका वठवितात. हे लोक अनेक अफवा उठवतात, गैरप्रचार करतात. शिवाय घरोघर जाऊन कुजबुजीच्या रूपाने हा प्रचार मोठ्या प्रमाणावर करणारे एक मोठे जणू सैन्यच त्यांच्याजवळ आहे.

रा. स्व. संघाबद्दल आणखी एक गोष्ट मला सांगायची आहे. रा. स्व. संघाचा हा कुजबुजीचा प्रचार फक्त कॉंग्रेसच्याच विरुद्ध असतो असे नव्हे तर तो अल्पसंख्यांक व हरिजन यांच्याही विरुद्ध असतो. काही लोक काय म्हणतात की, दंग्यानंतर झालेल्या चौकशांमध्ये, रा. स्व. संघाचा हात असल्याचे सिद्ध झालेले नाही; पण हे निश्चित सिद्ध झाले आहे की, रा. स्व. संघाचे पुढारी चिथावणीखोर भाषणे करतात, लेख लिहितात- वर्तमानपत्रातून हे सारे छापून आले आहे आणि एकूण जातीयतेचे-हिंसेचे-वातावरण तयार करतात. जमशेटपूरमध्ये त्यांनी काय प्रचार केला होता की, तिकडे अरब राष्ट्रांमध्ये एक तरी मंदिर आढळते काय ? मग आपल्याला इथे मशिदी हव्यात कशाला ? किंवा युद्धकाळात जणू प्रत्येक मुस्लिम हा पाकिस्तानचा हेरच आहे अशी भावना लोकांच्या मनात ते तयार करीत. भारत-पाक युद्धाच्या वेळी राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्या भावाने विमानाचे अपहरण करून ते पाकिस्तानात नेले अशी अफवाही त्यांनी उठवली होती. खरे तर झाकीर हुसेन यांचा हवाईदलात कुणी

भाऊ वगैरे नव्हताच; पण सतत पसरविल्या जाणाऱ्या अफवांचा जरूरच परिणाम होत असतो.

कम्युनिस्टांबद्दलही जाता जाता एक गोष्ट सांगितली पाहिजे. संधिसाधू जर कोणाला म्हणावयाचे तर ते कम्युनिस्टांनाच म्हणावे लागेल. त्यांचे म्हणणे असे होते की, मी 'पुरेशी' पुरोगामी नाही; पण मोरारजी देसाईंना मात्र पाठिंबा द्यायला ते एका पायावर तयार होते. खरं म्हणजे, अजूनही त्यांचा मोरारजीला तसाच पाठिंबा राहिला असता; पण हरिजनांच्या व अल्पसंख्यांकांच्या बाजूने मी आवाज उठवायला सुरुवात केल्यानंतर मात्र त्यांनी मोहरा बदलला. मार्क्सवादी कम्युनिस्टांचे तर अजूनही ठरलेले दिसत नाही.

(बंगाल आणि केरळमधील कम्युनिस्टांना इंदिरा गांधींचा हिसका कळलेला होता. त्यामुळे त्यांच्या दृष्टिकोनातून इंदिरा गांधी या फॅसिस्ट ठरल्या; पण महाराष्ट्रातील डाव्यांना इंदिराजींची बंडखोर प्रतिमा खुणावत असते व त्या प्रस्थापितात अजून का अडकून राहतात याचे आश्चर्य वाटते. यासंबंधीचा एक पत्रव्यवहार दिल्लीत पाहण्यात आला. म्हणून आम्ही विचारले :)

**: आम्ही अगोदर ज्या पत्राचा उल्लेख केला त्या पत्रामध्ये तुम्ही म्हटले आहे, "माझी अशी चमत्कारिक अवस्था झाली आहे की स्वभावतः मी प्रस्थापिताविरुद्ध असूनही, मला कायमपणाने प्रस्थापिताचाच एक भाग म्हणून वावरावे लागले आहे." या विधानाचे अधिक स्पष्टीकरण कराल का ?**

: ठरलेल्या अरुंद चाकोरीतून वाटचाल म्हणजे प्रस्थापित. समाज ही एक सतत बदलत राहणारी गोष्ट आहे – विशेषत: या काळात आणि आपल्या देशात. माझं कसं आहे की मी स्वभावतःच रूढीबद्ध चाकोरीच्या विरुद्ध आहे. अन् समाज केवळ परिवर्तनशीलच आहे असं नाही तर हे परिवर्तन झालेच पाहिजे व झपाट्याने झाले पाहिजे ! पण आपल्याला काय आढळतं ? आम्ही जेव्हा बाहेर चांगले कार्य करणाऱ्या एखाद्या अर्थवेत्त्याला वा शास्त्रज्ञात्याला किंवा एखाद्या कल्पक वा सृजनशील माणसाला मंत्रालयीन जबाबदारी देतो तेव्हा तो त्याच चाकोरीत अडकतो आणि त्याचा आणखी एक नोकरशहा बनतो.

तेव्हा माझ्या प्रस्थापितविरोधी असण्याचा अर्थ असा की अशा नोकरशाहीत, की जी अपुरीच नव्हे तर अपायकारक झालेली आहे, तिच्यात अडकणे टाळले पाहिजे आणि आपण अशी एक रचना निर्माण केली पाहिजे की ती या लोकांना, सामान्य माणसांच्या मनातील खळबळींशी संवाद साधू देईल. एवढेच नव्हे तर असा संवाद साधल्यानंतर हे लोक बदलू शकले पाहिजेत. ब्रिटिशांच्या काळातले उदाहरण आपण घेऊ. इंग्लंडमधून हिंदुस्थानात येणारे तरुण इंग्रज म्हणत असत की आम्ही काही 'कर्नल ब्लीप' नव्हेत. हिंदुस्थानी लोकांबद्दल आमच्या मनात सहानुभूती आहे वगैरे वगैरे; पण एकदा हिंदुस्थानात आल्यानंतर ते असे काही वेढले जात, की ते इतर इंग्रज अधिकाऱ्यांसारखेच वागू लागत. आतासुद्धा तुम्ही आय. ए. एस्. अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणकेंद्रात गेलात तर तुम्हाला असे दिसेल, की त्यांच्या मनात नोकरशाही प्रवृत्ती नाहीत; पण एकदा का त्यांच्या नेमणुका झाल्या, की ते इतरांसारखेच आपल्या बढत्या, आपले करियर यात अडकतात. अर्थातच त्या सर्वांना एकाच कुंचल्याने मला रंगवावयाचे नाही, कारण याला अनेक अपवादही आहेत. माझेच उदाहरण घ्या. मी पंतप्रधान होते तेव्हा मला जणू एका पिंजऱ्यात अडकल्यासारखे वाटत असे. मला कित्येक गोष्टी ज्या कराव्याशा वाटत होत्या आणि ज्या करणे आवश्यकही होते, त्या मी करू शकले नाही; कारण स्वत:चा पूर्ण आविष्कार करणेच त्या पिंजऱ्यामुळे अवघड झाले.

**प्र. : पुष्कळांनी अशी भीती व्यक्त केली आहे की सध्याची व्यवस्था कोलमडून पडेल. असे घडले तर आपल्या देशात लष्करी राजवट येऊ शकेल काय ?**

: असे घडू नये अशी माझी मनापासून इच्छा आहे. आपली संरक्षक दले ही खूपच समतोल विचाराची आहेत, विशेषत: इतर राष्ट्रांतील दलांच्या तुलनेने.

आता कुठलीही व्यवस्था टिकून कशी राहते ? सर्वप्रथम म्हणजे लोकांना आपले प्रश्न त्या व्यवस्थेत सुटत आहेत असे वाटले पाहिजे. जर आपल्या देशातील लोकशाही त्यांचे प्रश्न सोडवू शकली नाही तर तिच्यावरला त्यांचा विश्वास उडेल आणि रशियामध्ये १९१७ सालच्या रशियन क्रांतीपूर्वी जशी भावना निर्माण झाली होती तशी इथेही निर्माण होईल. ती भावना कोणती तर 'आपल्याजवळ गमावण्यासारखे काय आहे ? आपल्याला जखडणाऱ्या शृंखलांखेरीज ? तेव्हा आपण ही व्यवस्था उधळली तर काय बिघडणार आहे ?' अशी परिस्थिती कधीही येऊ नये असा आमचा प्रयत्न होता. मी स्वत: रक्तरंजित क्रांतीच्या विरुद्ध आहे. कारण एकदा हिंसेला प्रारंभ झाला की तुम्ही तुमचे लक्ष्य विसरता आणि हिंसेसाठीच हिंसा अशी साखळी सुरू होते.

इथे मात्र जनता पक्षातले पुष्कळ लोक लष्करी राजवट येण्याबाबत बरेच काही बोलत आहेत. भीतीमुळे बोलतात का काही आशेने बोलतात हे मात्र......

(ओघानेच विषय 'कायदा आणि सुव्यवस्था' याकडे वळला.)

**प्र. : 'कायदा आणि सुव्यवस्था' हा प्रश्न देशात फार तीव्र झाला आहे असे अलीकडे अनेकदा तुम्ही म्हणाला आहात. कोणती 'व्यवस्था' तुम्हाला अभिप्रेत आहे आणि कोणता 'कायदा' आणला म्हणजे ती व्यवस्था येऊ शकेल ?**

उ. : कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नुसता तीव्र झालेला नाही तर ती व्यवस्था पूर्णपणे मोडलेलीच आहे. कोणीही बाहेर जाणारी व्यक्ती सुरक्षित नसते. जनता पक्षातल्या एका महत्त्वाच्या व्यक्तीने– मी तुम्हाला नाव सांगत नाही–आमच्या एका खासदाराला सांगितलेली एक घटना तुम्हाला सांगते. एकदा हे महाशय घरी गेले असता त्यांची पत्नी त्यांना म्हणाली, 'तुमच्या जनतापेक्षा इंदिरा गांधींचे राज्य खूपच बरे होते.' तेव्हा तो जनताचा खासदार रागावला व तिला म्हणाला, 'तू असं कसं म्हणू शकतेस ? हे अत्यंत मूर्खपणाचं बोलणं आहे. तू हे विसरलीस का की तिने मला वर्षभर तुरुंगात

टाकलं होतं!' तेव्हा ती म्हणाली, 'तुरुंगात निदान तुम्ही सुरक्षित तर होता! आता तुम्ही घरी सुखरूप याल याची मला खात्रीच नसते!'

**: परंतु आम्हाला असे म्हणायचे आहे की, स्वतःच्या हक्कांसाठी चालू असलेले कामगार-शेतमजुरांचे लढे (बेल्ची, पंतनगर, बाजीतपूर इ.) हा वेगळ्या दृष्टिकोनातून पाहावयाचा प्रश्न आहे आणि त्याला कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असे संबोधता येणार नाही.**

: हो. कबूल. ते वेगळे प्रश्न आहेत. मी त्यांना उद्देशून बोलत नाही. कायदा आणि सुव्यवस्था मोडकळली आहे असे मी म्हणते तेव्हा त्याचा अर्थ असा की, कोणीही कुणाची लूटमार करावी, खून करावा व त्याची साधी चौकशीही होऊ नये! गुन्हेगारे मोकाट असावेत-अशा परिस्थितीबद्दल मी बोलत आहे आणि हे गुन्हे घडतात यापेक्षाही अधिक भयानक म्हणजे लोकांची त्याबाबत असलेली अनास्था!

आता एकदा असं घडलं की, दिल्लीच्या एका व्यापाऱ्याचा मुलगा-पंजाबमध्ये अंबाल्याजवळ तो कुठे तरी काम करत असतो-खूप वेळा दिल्लीला येतो. बऱ्याच वेळा त्याची बायकोही त्याच्याबरोबर असते. कारण तिचे माहेर दिल्लीत आहे. तर एकदा त्याला तेथून निघायला उशीर झाला-अन् म्हणून ती त्याच्याबरोबर आली नाही. तो आणि त्याचा ड्रायव्हर भर दिवसा निघाले. संध्याकाळी सहाचा सुमार असेल. एकदम जीप भरधाव येऊन त्यांच्यासमोर उभी राहिली. त्यांना वाटले पोलीस असतील. जीपमधील माणसे रिव्हॉल्व्हर घेऊन उतरली व त्यांनी यांना रोखले आणि या दोघांना गाडीच्या बाहेर काढून अक्षरशः नग्न केले आणि सर्व लुटून नेले. आश्चर्य असे की, इतरांना जेव्हा ही हकिकत कळली तेव्हा त्यांनी उद्गार काय काढले तर 'ये तो रोजही होता है!' हा कोणत्या प्रकारचा समाज की जेथे एवढी अनास्था आहे! तो व्यापाऱ्याचा मुलगा म्हणाला, 'माझी बायको माझ्याबरोबर नव्हती, ही केवळ परमेश्वराचीच कृपा!'

**: हे विलक्षण आहे.**

: बलात्काराचे प्रमाणही वाढले आहे, आता तर लोक रात्रीच्या नाटक-सिनेमांनाही जात नाहीत! एकदा एक माणूस त्याची बायको व मुलगी रात्रीचा सिनेमा संपल्यावर घरी जायला निघाले. त्यांची स्कूटर चालू होईना. त्याने आपली स्कूटर दुरुस्त करून सुरू करेपर्यंत बाकी सर्व लोक निघून गेले होते व जवळपास कोणीही उरले नव्हते. तेवढ्यात चार माणसे आली व म्हणाली, तुमच्यातील एका स्त्रीस येथेच सोडा! नाही तर तुम्हाला आम्ही गोळ्या घालू! त्यांनी मुलीला पकडले आणि तिची आई म्हणाली, मी थांबते-तिला घरी जाऊ द्या! त्यांनी मुलीला सोडले आणि त्या चौघांनी तिच्या आईवर बलात्कार केला. पहाटे ती घरी परत गेली आणि नंतर तिने आत्महत्या केली!

**: असे प्रकार उत्तरेकडे जास्त घडतात, का?**

: अहो, जिथे जिथे जनता पक्षाचे राज्य आहे, तिथे ते घडतात. बिहारात तर जनता पक्षाचे आमदारच खुनासारख्या गुन्ह्यात सामील आहेत, असे बोलले जाते. त्यांना कुणी काही विचारलेही नाही. अलीकडेच एके ठिकाणी बारा जण एकदम मारले गेले!

**: गुन्हे कायमच घडत आले आहेत. त्यांची अनेक कारणे आहेत. उदाहरणार्थ, मुक्त समाजाचे आकर्षण Permissive society चे आदर्श, वगैरे. तुमच्याही कारकीर्दीतही गुन्हे घडतच होते की!**

: अर्थातच, मी असे म्हणत नाही, की माझ्या कारकीर्दीत गुन्हे घडत नव्हते. पण ते रोखायला काही प्रयत्न व्हायला हवा की नको? आत्ता तसे प्रयत्नच होताना दिसत नाही. गुन्हेगारांना उत्तेजन मिळायला चित्रपट वगैरे खूप कारणं आहेत हे खरं. पण सरकारचीही जबाबदारी असते. गीता आणि संजय चोप्रांच्या खुनानंतर दिल्लीतील स्त्रिया खूपच अस्वस्थ झाल्या होत्या. सामान्य स्त्रिया की ज्यांचा कोणत्याही राजकीय पक्षाशी काहीही संबंध नाही. अशा त्या मोरारजी देसाईंना भेटायला गेल्या. त्या म्हणाल्या, 'आम्ही मध्यमवर्गीय स्त्रिया आहोत. आम्हाला लहान मुले आहेत. दर वेळेला त्यांच्याबरोबर शाळेत वा इतरत्र कोणाला सोबतीस पाठविण्यास आम्हाला शक्य होत नाही. जर आमची मुलं सुखरूप घरी येणार नसतील तर आम्हाला तुमच्या लोकशाहीचा काय उपयोग?' आणि मोरारजींनी काय उत्तर द्यावे? तर म्हणे 'अमेरिकेत दर अडीच मिनिटाला एक खून होतो,' ही त्यांची प्रतिक्रिया! त्यातील एक स्त्री माझ्याकडे आली व म्हणाली, 'भारताच्या पंतप्रधानाने आम्हाला असे उत्तर द्यावे?' आणि अमेरिकेसारखी परिस्थिती येथे आणणे हेच त्यांचे उद्दिष्ट आहे काय?

पूर्वी गुन्हेगारी होती, हरिजनांवरही अत्याचार होत नसत असे नाही. हे प्रश्न आहेतच. पण लोकांना वाटते त्यांचे ऐकणारे कोणी तरी होते. दहा प्रश्नांपैकी निदान दोन प्रश्नांची तरी दाद लागत असे पण तसा प्रयत्नच आता दिसत नाही व परिस्थितीवर कसलेही नियंत्रण नाही.

(खरं म्हणजे ठरलेली वेळ संपली होती. सकाळी ९ ते १०, २६ जुलै. आमच्या लिखित प्रश्नांपैकी दोन-तीन प्रश्न बाकी होते. आम्ही तरीसुद्धा घड्याळाकडे पाहिले व उठण्याची तयारी दाखवली. त्यांनी कटवण्यापेक्षा आपण वेळ संपताच निघणे चांगले नव्हते का? तशा त्याही २१३ वेळा उठून आतबाहेर करून आल्या होत्या. एकदा फोन आला म्हणून पलीकडच्या खोलीत जाऊन आल्या. एकदा बाहेर एक मोर्चाच येऊन त्यामुळे थोडा व्यत्यय आला. मध्येच संजय डोकावून काही निरोप देऊन-घेऊन गेला होता. असा वेळ लांबत गेला व त्यांनीही अगदी घड्याळाचा काटा पाहिला नाही. उरलेले लिखित प्रश्न, चालू विषय, विषयांतर अशी शेवटी सरमिसळ मात्र झाली.)

**प्र.: सध्या ज्या काही राजकीय घडामोडी चालू आहेत त्याबद्दल काही सांगू शकाल काय?**

: आत्ताच आम्हाला असं कळलंय की मोरारजीभाईंनी जवळजवळ ५६ डुप्लीकेट नावं आपल्याला पाठिंबा असलेल्यांच्या यादीत

(राष्ट्रपतींकडे दिलेल्या) घातली आहेत. गंमत म्हणजे, असं म्हणतात की त्यात देवराज अर्सचं नाव आहे, जॉर्ज फर्नांडिसचं नाव आहे !

**: तुमच्या पुनरागमनाची बऱ्याच लोकांना खात्री वाटते आहे!**

: हा बदल एकदम कसा झाला असावा ? आम्हाला मोरारजींचे सरकार नको होते हे उघड होते पण...

**: कदाचित तुमच्या ११ वर्षांच्या (तुलनात्मक दृष्टीने) स्थिर सरकारमुळे असेल...**

: हो, आणि माझी ११ वर्षांची कारकीर्द फारच संकटमय होती— दुष्काळ, युद्ध, आर्थिक अरिष्ट, इतर राष्ट्रांकडून येणारी दडपणं— विलक्षणच !

**: जनता पक्षाला पक्षबांधणीचा आता मुळापासूनच विचार करावा लागेल. पाच वर्ष तरी जनतेत जाऊन पुन्हा काम केल पाहिजे...**

: अं हं. नुसतं पक्षबांधणीचं कार्य नाही. हे लोक मामुली प्रश्नांवर फार भर देतात. आता त्यांचे एकमेव उद्दिष्ट काय होते तर इंदिरा गांधीला शिक्षा करणं. या शिक्षेची मला जर काही धास्ती असती तर त्यांचे उद्दिष्ट काही प्रमाणात तरी सफल झालं असतं; पण मला तर त्यांच्या खटल्यांची बिल्कूलच पर्वा नाही; कारण मी काहीही बचाव दिला तरी ते मला शिक्षा करणारच. त्यामुळे मी तर त्या खटल्यांमध्ये काही रसच घेत नाही.

**: 'माणूस' साप्ताहिकाने जुलै १९७७ मध्येच तुमचा पराभव झाल्यावर लगेच असे म्हटले होते, की या व्यक्तीशी अशा तऱ्हेने व्यवहार करून चालणार नाही. जेवढा तिचा छळ होईल तितक्या प्रमाणात लोक तिच्या भोवती गोळा होतील...**

: मीही माझ्या लोकसभेतील अटकपूर्व भाषणात म्हटले होते, की माझ्यावरचा प्रत्येक हल्ला किंवा मला दिली जाणारी प्रत्येक शिक्षा राज्यकर्त्यांवरच उलटेल !

**: तुम्ही निवडणूक हरून जी काही किंमत मोजायची ती मोजली होती, असेच ना ?**

: मी जी किंमत मोजली ती पूर्ण जाणीवपूर्वकच मोजली होती. कारण निवडणुका घेताना पराभवाची शक्यता मला दिसतच होती. मी आणीबाणी अगोदरच उठवू शकले असते. कारण राजकीय परिस्थिती पहिल्या वर्षातच पूर्णपणे आटोक्यात आली होती. जर १९७६ साली निवडणुका घेतल्या असत्या तर आम्ही जिंकलो असतो; पण मी असा विचार केला की, जर आता आर्थिक स्थिती आटोक्यात आणता आली तर देशहिताच्या दृष्टीने ते इष्टच होईल. कदाचित राजकारणी व्यक्तीला न मानवणारा असा तो निर्णय होता आणि जेव्हा मला असे वाटले की, आता आर्थिक गाडे रुळावर आले आहे तेव्हा मला निवडणुका न घेण्याचे काहीच कारण नव्हते. किंबहुना खूपजण मला निवडणूक न घेण्याबाबतच सल्ला देत होते. शिवाय लोकसभेनेही एक वर्षाची मुदत वाढवून दिलेली होती, तरीही मी निवडणुका घेतल्या.

**; मग तुमचा निवडणुकीबाबतचा अंदाज चुकला का काय म्हणायचे ?**

: मी तुम्हाला सांगितलंच की, मी काही अंदाज, गणिते मुळी बांधलीच नाहीत. मी फक्त इतकाच विचार केला की, एकदा देशाला किमान स्थैर्य लाभल्यानंतर निवडणुका न घेण्याचे काहीच कारण नव्हते. मी हेरखात्याचा सल्ला घेतला नाही की माझ्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांचा घेतला नाही. कदाचित असा विचार करणे चूक असेल; पण मी तेव्हा असा विचार केला होता. आधी निवडणुका घेतल्या असत्या तर आम्ही जिंकलोही असतो; पण आर्थिक गाडे रुळावर आणणे कठीण गेले असते. कारण निवडणुकांमुळे आमच्या प्रयत्नात खंड पडला असता.

**: पण तुम्ही अजूनही असे कसे म्हणता की, आणीबाणीतील अतिरेकांची तुम्हाला काहीच कल्पना नव्हती ? निदान विनोबांचा सल्ला मानून तरी आणीबाणी तुम्ही सहा महिन्यांनंतर उठवायला हवी होती. कारण नंतर फक्त अतिरेकच वाढत राहिले.**

: अजूनही मला अतिरेकांची कल्पना नाही. कोणतेही आयोग खरे म्हणजे काही खास अतिरेक पुढे आणू शकलेले नाहीत. कुटुंबनियोजनविषयक झालेले 'अतिरेक', डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार सामान्यतः ठराविक टक्के केसेसमध्ये घडतातच. ते अपघात—अन् तेही कमी प्रमाणात आहेत.

**: वृत्तपत्रनिर्बंधांबाबत तर अतिरेक झाले होते !**

: गंमत अशी की, एखादे मासिक पुण्याला बॅन होत असे तर मुंबईत त्याच्या वितरणाला मुभा मिळे—एका कुटुंबनियोजनविषयक मासिकासंबंधात असे घडले होते. महाराष्ट्रात तर पोलिसांकडे ही कामगिरी सोपवण्यात आली होती. मग काय घडणार ? आश्चर्य म्हणजे माझी भाषणंसुद्धा सेन्सॉर होत, कापली जात.

**: तुम्ही मध्यावधी निवडणुकांची मागणी केल्याचे वृत्त आजच प्रसिद्ध झाले आहे...**

: छे ! छे ! मी तसे म्हटलेले नाही. मी म्हटले होते की, जरी मध्यावधी निवडणुका घ्यायच्या झाल्या तरी त्या ऑक्टोबरपूर्वी घेता येणार नाहीत. कारण सध्या पावसाळा आहे आणि शिवाय मतदारांच्या याद्याही तयार नाहीत. खरे म्हणजे याद्या दरवर्षी तयार असायला हव्यात. ते का तसे करत नाहीत मला माहीत नाही आणि शेवटी निवडणुका घेणे न घेणे राष्ट्रपती व सरकार असल्यास सरकारच्या हाती. शिवाय आम्ही आता तशी मागणी केली तर इतर पक्षांचे खासदार आमच्यावर चिडतात. कारण ते तर निवडणुकांना भयंकरच घाबरलेले आहेत आणि आम्ही त्यांना आता 'चिडवू' इच्छित नाही.

**: नवीन जे कोणते सरकार येईल ते स्थिर राहू शकेल असे तुम्हाला वाटते काय ?**

: नाही; पण मोरारजींचे सरकारही स्थिर राहू शकले नसतेच. तेव्हा तो प्रश्न नाहीच. शिवाय एकदा अविश्वासाच्या ठरावामुळे राजीनामा दिल्यानंतर परत सरकार बनविणे हे काही योग्य वाटत नाही.

**: देवराज अर्सबद्दल काही ? तुम्ही त्यांना का काढलेत ?**

: प्रश्न असा होता की, पुष्कळ वेळा ते पक्ष तोडण्याचा प्रयत्न करत होते. आम्ही काही त्यांना काढून टाकू इच्छित नव्हतो; पण ते म्हणत, मी काही नेतृत्वाचे ऐकणार नाही. शिवाय राजीनामा देण्याचीही भाषा ते एकीकडे करत होते–वर्ष–दीड वर्षभर जवळ-जवळ. जिल्हा प्रदेश काँग्रेसच्या नेमणुका त्यांनीच एकतर्फी केल्या होत्या. एम्. जी. रामचंद्रननाही त्यांनी विचारले, 'तिला तुम्ही तंजावरहून का उभे करता ? आमचा पक्ष तर आता फुटणार आहे आणि तिच्याबरोबर कुणी राहणार नाही.' मग मी असा विचार केला की, रामचंद्रनना मी अडचणीत टाकणे बरोबर नाही. तंजावरचे लोकसुद्धा माझ्यावर खूप रागावले होते. मला त्यांची खूपच समजूत काढावी लागली...

(जशी सुरुवात तसा शेवट. प्रास्ताविक नाही तसा समारोपही नाही. रेडिओवर बटन फिरवून एकदम नवे स्टेशन घ्यावे तशा इंदिराजी नव्या कार्यक्रमाकडे, नव्या मुलाखतीकडे चटकन वळतात. आम्ही नमस्कार करून बाहेर पडतो.

१२, विलिंग्डन क्रेसेंटचे फाटक येताना उघडे होते. निघालो तेव्हा बंद होते. मघाचा मोर्चा बाहेरच अडवण्यात आलेला होता. त्यांच्याच 'नॅशनल हेराल्ड' या वृत्तपत्रातील कामगार कर्मचाऱ्यांचा हा मोर्चा होता. फलकांवर संतप्त घोषणा लिहिलेल्या होत्या. दोन पोलीसगाड्याही उभ्या होत्या.

बंद उद्योग, बेकारी आणि बेशिस्ती, बेजबाबदार राजकारणी, लोकशाहीवरचा लोकांचा उडत चाललेला विश्वास, वाढत चाललेला शहरी बकालपणा, पंचतारांकित वर्तुळात वावरणारे इंदिरा गांधींचे अनेक सहकारी आणि अकाळविकाळ झोपडपट्ट्यांतून त्यांच्याकडे आशेने पाहणारा, उध्वस्त जीवन जगणारा अफाट जनसमुदाय.......हे चित्र कसे जुळवायचे ?

नंतर आम्ही 'सेमिनार'चे संपादक रोमेश थापर यांना भेटलो. हेही पी. एन्. हक्सर यांच्याप्रमाणेच इंदिरा गांधींचे एके काळचे विश्वासू सहकारी. त्यांच्या 'किचन कॅबिनेट'-मधील एक म्हणून ओळखले जात. त्यांचा ह्या सर्व 'सिस्टिम'वरचा विश्वासच उडालेला दिसला. सध्याच्या दिल्लीतील घडामोडींमुळे इंदिरा गांधींचे पारडे जड होत आहे हे त्यांनाही दिसते आहे; पण उद्विग्न होऊन ते म्हणतात, 'इंदिरा गांधी तरी येऊन काय करू शकणार आहेत? त्या आत्मकेंद्रित आहेत. त्यांच्यासमोर निश्चित धोरणही नाही. 'स्ट्रक्चर'च बदलायला हवे.'

'न्यू वेव्ह' साप्ताहिकाचे गणेश शुक्लाही भेटले. सध्या त्यांचे साप्ताहिक दिल्ली-कलकत्त्यातील राजकारणी मंडळीत बरेच लोकप्रिय आहे. त्यांना इंदिरा गांधी हा एक 'hopeful factor' वाटतो. त्यांच्या मते इंदिरा गांधींकडे राजकीय डावपेचांचे चातुर्य, राष्ट्रवादी दृष्टिकोन, साम्राज्यवादविरोध आणि लोकांचा प्रचंड पाठिंबा या गोष्टी आहेत; पण हे गुण संघटना व कार्यकर्ते या दोन आधारस्तंभांशिवाय व्यर्थ आहेत आणि इंदिरा गांधी त्याबाबत जागरूक नाहीत ही दुर्दैवाची बाब आहे.

जिथे संघटना आहेत तिथे हे गुण नाहीत. जिथे हे गुण आहेत तिथे संघटना नाही.

एकूण काय ? काळ मोठा कठीण दिसतो आहे. □



लेखक : पु. ल. इनामदार मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## पुस्तके

### ग्रंथपरीक्षण (समम् बोनम)

# CHARAN'S RAJ

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी

पुरवा दिल्लीतील सत्तालक्षी साठमारी चालू असता प्रस्तुत ग्रंथपरीक्षकाला दिल्लीस भेट देण्याचा योग आला. स्पेनमध्ये जाणे परवडत नसल्याने, तसेच सध्या भारतात राजकीय पक्षांचे सुलतान वगळल्यास इतर राजे नसल्याने साठमारी पाहण्याची एवढी चालून आलेली संधी हुकविणे आमच्या विश्लेषणी, चिकित्सक, संशयी मनाला प्रशस्त वाटेना. परंतु अधूनमधून 'माणूस'मध्ये ग्रंथ परीक्षणे लिहीत असल्याने काही ताजे ग्रंथराज मिळाल्यास पाहावेत म्हणून राजधानीचे गल्ली-बोळ, राजरस्ते धुंडाळले आणि 'माणूस'च्या व वाचकांच्या नशिबाने नवीन ग्रंथच नव्हे, तर भविष्यात येऊ घातलेल्या ग्रंथराजाची हस्तलिखिते हस्तगत करता आली.

इतिहासाची व्याख्या इतिहास संशोधन मंडळवाले किंवा विद्यापीठ क्षेत्रातील संशोधक प्राध्यापक मंडळी काहीही करत असले तरी ती आम्हाला तूर्त तरी स्वीकारणे शक्य वाटत नाही. गिबनपासून ते शेजवलकरांपर्यंतचे इतिहासकार आम्ही ओळखत नाही. आणीबाणीनंतर आम्हाला चुरचुरीत, चावट, चित्तचक्षुचमत्कारिक इतिहासाची (?) चटक लागली आहे. १९७७ च्या गाजलेल्या (व आता गंजलेल्या) दुसऱ्या स्वातंत्र्यानंतर आम्ही इतिहासही नव्याने घडविला आहे! आम्हाला गवसलेले ग्रंथ झटपट-इतिहास ह्या जातीचे आहेत. ला पियर् प्रभृतींनी जी इतिहासाची चटकदार भेळ तयार करून जगभर खिरापत केली त्या जातीचा ग्रंथराज आज परीक्षणार्थ आमचे पुढे आहे. हस्तलिखिते फक्त काही काळ हाताळायला मिळाल्याने खोलवर जाऊन परीक्षण करणे कठीण आहे. वाचकांनी या 'ट्रेलर'वर समाधान मानून समग्र ग्रंथ बाजारात आल्यावर चवीने वाचावा!

ह्या झटपट इतिहासाची काही पथ्ये असतात. उदा० वर्तमानपत्रांतील संदर्भहीन व अपुरी कात्रणे, ज्यांचा घटना किंवा व्यक्ती यांच्याशी संबंध नाही त्यांच्या मुलाखती, कुठल्या तरी पत्रांच्या खऱ्या-खोटया फोटो-स्टॅट प्रती, चुरचुरीत इंग्रजी (किंवा एखादी भारतीय भाषा) व एक संपन्न प्रकाशन-संस्था यांचा एकेक चमचा टाकून ढवळले नाही तरी झटपट इतिहासाचे खपाळू व नामी रसायन रटरटून तयार होते. ही खमंग भाजणी कडबोळी, चकल्या, थालीपीठे किंवा नुसती थापून सेवन केली तरी आठ दिवस बोलायला, आपण 'इंटुक' असल्याचे दाखवायला वगैरे मोठी मदत होऊन इहलोकीचे चार-आठ दिवस सुखाने क्रमीत होतात. हा माल साक्षेपी वाचकांना वैताग आणणारा असला, तरी खपतो बरीक उत्तम.

अशा ऐतिहासिक फरसाणची माहिती सर्वप्रथम एका मराठी साप्ताहिकाच्या वाचकांना मिळावी हा मोठा भाग्याचा ठेवा मानायला हवा आणि साहित्यसमीक्षेच्या इतिहासकारांनी याची नोंद घ्यावी.

आमचे हाती सापडलेला ग्रंथराज शीर्षकहीन आहे. त्याचे कारण प्रकाशकाच्या 'चार शब्दात' पंधरा मिनिटे वाचल्यावर सापडले. ते असे. वेळ अपुरा असल्याने आणीबाणीत उदयाला आलेल्या थोर इतिहासकारांना एकत्र दावणीला गुंफून हा 'अँथॉलॉजी' वजा ग्रंथ साकार झाला आहे. एकेक प्रकरण लिहिणारे लेखक दिग्गज आहेत. जनता पक्षाने जो चरणसिंगांचा स्वप्नभंग केला त्याचा प्रतीकात्मक गडद अंधार म्हणजे मुखपृष्ठ व राजनारायणांच्या हृदयातील व डोक्यातील पोकळी सूचकपणे ग्रंथ शीर्षकहीन ठेवून करण्यात आली आहे.

हा ग्रंथ 'सत्यकथा'कडे जर अभिप्रायार्थ आलाच तर त्यावरील लेखमालेतील पहिला लेख शीर्षकहीनता व सूचक अंधारावरच खर्च होईल!

एकेक प्रकरण सजविणारे लेखक-इतिहासकार दिग्गज आहेत. उदा० 'जज्मेंट' व 'बिहाइंड बार्स'वाले कुलदीप नय्यर, 'ऑल द् जनतामेन'वाले जनार्दन ठाकूर, उमा वासुदेव, मथाई, नयनतारा सहगल अशी बडी धेंडे एकत्र जुंपण्यात येऊन त्या ग्रंथसूर्याचा रथ सजविण्यात आला आहे. ग्रंथाला शीर्षक का नाही, असे आम्ही प्रकाशक-श्रींना विचारता ते श्रीमंत हास्य चेहऱ्यावर आणून म्हणाले, 'ग्रंथ प्रकाशित होऊन ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्याच्या आत खपवायला हवा. नाही तर तेव्हाना चरणसिंग धुळीस मिळाले तर आणीबाणीत आपटलेल्या-फ्लॉप गेलेल्या-संजय ग्रंथाप्रमाणे ग्रंथ रद्दीच्या भावात खपविण्याची वेळ येईल! तेव्हा नावात काय आहे किंवा नवीन प्रकाशन टूम म्हणून शीर्षकहीनता खपू शकेल, असा प्रकाशक-श्रींचा हिशोब असावा. प्रस्तुत लेखकाला कोटी करण्याचा मोह अनावर झाला आणि त्याने खालील शीर्षक सुचविले. 'CHARAN'S RAJ'

म्हणाले, चरणसिंगांचा राजनारायण हा एक अर्थ, दुसरा अर्थ चरणसिंगांचे 'राज्य' आणि तिसरा अर्थ चरणचे 'रज!'

तीन अर्थांमुळे प्रकाशक-श्रींना हसू अनावर झाल्याने, चौथा अर्थ सांगितला नाही; पण प्रकाशक-श्रींनी दाद दिली व आम्ही सुचविलेले शीर्षक एक रुपया रोख देऊन 'बुक' केले. इंदिरा गांधींचा उल्लेख इतिहासात वा कालकुपीत काय होईल ते होवो. आज तरी त्यांच्यामुळे आमचे काही झटपट इतिहासकार व प्रकाशक लक्षाधीश बनले आहेत. इंदिरा गांधींचे कृतज्ञ तरी कुणी कुणी राहयचे? जनता पक्षवाल्यानी, इतिहासकारांनी, अल्पसंख्याकांनी, बहुसंख्याकांनी? तेव्हा या कृतज्ञतेच्या फुलाची पाकळी म्हणून आपण त्यांना पुन्हा पंतप्रधान करू या का?

आम्ही हाताळलेल्या व नजर फिरविलेल्या इतिहासग्रंथ-कादंबरीत न्यायी, नि:स्पृह,

समतोल लिखाणाचा इतक्यांदा दावा केला की, त्या ग्रंथाच्या गडद काळ्या मुखपृष्ठावर कोपऱ्यात 'असली इतिहास' अशी चंदेरी कॅप्शन टाकण्याची आम्ही प्रकाशकांना विनंती केली, तीही त्यांनी 'पावली' देऊन 'बुक' केली ! पहा, ग्रंथपरीक्षणासाठी अप्रकाशित व अपूर्व ग्रंथ चाळायला मिळाला आणि वर सव्वा रुपाया !

आता आमच्या वाचकांना प्रकरणांची शीर्षके व मसाला विदित करून ह्या अपूर्व ग्रंथपरिचय आटोपता घेतो.

पहिले प्रकरण होते 'थ्री फेसेस् ऑफ मोरारजी !' इंदिराजींनंतर आल्यामुळे मोरारजींना एका अधिक चेहऱ्याची नाही तरी गरज होतीच ! मोरारजींचे ब्रिटिश नोकरीतले 'जातीय' वर्तन, कॉंग्रेस व क्रांति हा दुसरा मुखवटा आणि तिसरा जनता महामंत्री व क्रांतीपिता म्हणून ! शिवाम्बुप्राशनाच्या प्रसंगांचे सचित्र दर्शनही तिथे घडेल. मोरारजींच्या बाथरूममध्ये शिरणारा कोण बरे हा सत्यान्वेषी इतिहासकार ?

'विकेड वेज् ऑफ सुरेश राम' ह्या बाबूजींच्या वरील प्रकरणात मजकूर नव्हताच जवळजवळ; परंतु भरपूर जवळजवळ असलेल्या सुरेशराव व त्याच्या प्रिय पात्राची गूढ चित्रे होती. कामशास्त्रावरील ग्रंथाची काही पृष्ठे इकडे आली असावीत असा भास मज दीनाच्या चेहऱ्यावर प्रकटताना पाहून प्रकाशक–श्रींनी ती चित्रे अस्सल दस्तऐवज असल्याची ग्वाही दिली. त्या ऐवजावरची खिळलेली नजर पुढे खेचून पाहिले तर ते प्रकरण 'टेन फेसेस ऑफ राजनारायण' असे होते. मला वाटले हे रामायणातल्या रावणावरील प्रकरण असावे; परंतु त्या प्रकरणात राजनारायणांनी आजवर बदललेले पक्ष व केलेले राजकीय नेत्यांचे उच्चाटन मोठ्या विनोदी आणि प्रश्नोत्तरी थाटात सादर केलेले होते. प्रकरणातील रेखाटनात कोलांट्या उड्या मारणारा गोरीला प्रामुख्याने डोळ्याला फडके बांधून वावरत होता. आणखी एका प्रकरणाचे शीर्षक फ्रेंच होते –'डिनोवूमेंट' ह्या प्रकरणात लेखकाने आपला सल्ला न घेतल्याने व मानल्याने जनता पक्षाचा फारच नाश झाला, हे एक्स्प्रेसमधील उताऱ्यांच्या उदाहरणांनी सप्रमाण दाखविले होते. 'नूरपूर ते नवी दिल्ली' हे प्रकरण चरणसिंगांचे 'चेअरसिंगी' स्वरूप उघड करत होते. ही (HE) ह्या प्रकरणाचे हस्तलिखित पिवळ्या पानांवर लिहिले असल्याने त्यावरील मजकूर काय असावा ह्याची काविळकल्पना सहज आली. मोरारजीभाईंपासून सर्व विवाहित–अविवाहित जनतानेत्यांची 'प्रकरणे' त्यात नेहमीप्रमाणे सादर करण्यात आली होती. प्रकाशक–श्रींनी सांगितले की, काही संपादकांनी एकेक लाख रुपये या HE प्रकरणी 'ऑफर' केले होते. 'राहू–केतू' हे प्रकरण ज्योतिषशास्त्रातील वाटून मी पाने पुढे उलटणार तोच 'चरण–(राज) नारायण' ही जोडगोळी दिसली ! 'उकाडा' हे दिल्लीच्या हवामानावरील भौगोलिक प्रकरण नसून, समाजवाद्यांना कोणत्याही पक्षात किती झटकन् उकडू लागते व ते तात्त्विक चर्चा व कीस काढत कसे बाहेर पडतात, याचे प्रत्ययकारी वर्णन त्यात केले होते. 'माय डेज इन जनता' हे प्रकरण बहुगुणा व पटनाईक यांची कशी मुस्कटदाबी झाली व त्यामुळे वैतागून त्यांना जनता पक्ष कसा सोडावा लागला याची हकीकत साधार सांगते. (ही मुस्कटदाबी 'अर्थपूर्ण' असावी असा ग्रंथ चाळताना भास झाला !) 'टू बी ऑर नॉट टू बी' हे प्रकरण संघ–जनसंघवाल्यांची दुःखे व कहाणी सांगते. एकूण प्रत्येक प्रकरण समर्थ, शैलीदार लेखकाने लिहिले असल्याने ते मुळातच वाचायला हवे.

हा ग्रंथ मुळातच वाचला जावा; त्यावर बरे-वाईट मत प्रत्यक्ष प्रकाशन होईपर्यंत आम्ही राखून ठेवत आहोत. ख्रिस्तवचन पाळण्याची मला ओमप्रकाश त्यागींनी धर्मांतरविरोधी बिल मांडल्यापासून मोठी खुमखुमी आली आहे. ख्रिस्त सांगतो Thou shalt not Judge ! तेव्हा हा प्रचंड पॉट–बॉयलर, जायंट थ्रिलर व काल्पनिक इतिहास वाचकांवर सोपवून, प्रत्यक्ष ग्रंथप्रकाशनानंतर 'माणूस'च्या वाचकांना पुन्हा भेटण्याचे वचन देऊन ही ग्रंथटीका आटोपती घेतो.

**टीप** : या ग्रंथातील सर्व पात्रे व प्रसंग व घटना ऐतिहासिक असल्याची सर्व लेखकांची खात्री आहे.

ग्रंथाचे शीर्षक : तात्पुरते
Charan's Raj
पृष्ठसंख्या : ठरली नाही.
मूल्य : शून्य. किंमत : ६५ रुपये.
प्रकाशन दिनांक : ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यापूर्वी किंवा मध्यावधी निवडणुका जाहीर होण्यापूर्वी किंवा १९७७ नंतरचा तिसरा पतप्रधान येण्यापूर्वी. □


पुढील अंकापासून सुरू होत आहेत...

# काबूल-कंदहारची अनोखी वार्तापत्रे

जिथून गझनीचा महंमद हिंदुस्थानात आला,
जिथून अहमदशहा अब्दाली पानपतावर कोसळला
आणि जिथे आज तराकींची रशियावादी कम्युनिस्ट
राजवट उलथून टाकण्यासाठी सारा 'इस्लाम' संघटित होत आहे
आणि येणाऱ्या-जाणाऱ्या परदेशी प्रवाशांना सांगत आहे :
'पहा तुम्ही, एक रशियन इथं शिल्लक ठेवणार नाही आम्ही' .... !

केरळ - दिल्लीच्या गाजलेल्या वार्तापत्रांनंतर 'माणूस'ने घेतलेली नवी झेप

## 'चलो काबूल' !

चित्रप्रदर्शन

# भावनांचा रंगसोहळा

काव्य म्हणजे कुंचल्याविना रेखाटलेलं चित्र आणि चित्र म्हणजे शब्दांवाचून फुललेलं काव्य ! असंच एक काव्य अनुभवायचा योग नुकताच आला. श्री. श्याम जोशींच्या स्टुडिओमध्ये जेव्हा मी गेले तेव्हा तिथे त्यांनी रंगवलेल्या चित्रांचा खच पडला होता आणि नंतर त्यांनी एक एक चित्र दाखवायला सुरुवात केली.

'हायकू' हा काव्यप्रकार आपल्याला तसा नवीनच आहे. जपानी काव्यप्रकार आहे हा. एखादी भावना मोजून १७ शब्दांत, तीन ओळींच्याच मर्यादेत व्यक्त करणारा काव्यप्रकार म्हणजे हायकू. वर्षाकाठी एकामागून एक वेगवेगळे ऋतू येतात आणि निसर्गावर आपापला ठसा उमटवून जातात. मग त्या त्या ऋतूतील हवा, पानं, फुलं, पक्षी, आकाश आणि त्यांच्याशी असलेलं व्यक्तिव्यक्तीचं नातं ह्यांचा खुबीदार उल्लेख जपानी कवींच्या 'हायकू'मध्ये आढळतो. हायकूचा खरा आस्वाद घ्यायचा असेल तर ऋतूंची संपूर्ण माहिती असायला पाहिजे; निसर्गावर निस्सीम प्रेम असायला पाहिजे. मानव आणि निसर्ग एकमेकांत गाढ विलीन झालेले आहेत ही भावना पक्की झाली की हायकू जन्माला येतो. इतका हा पिटुकला हायकू—ना त्यात कुठे उत्तानता, ना भडकपणा, पण मनाच्या नाजूक तारा हळुवारपणे छेडून जातो. अशा ह्या काव्यप्रकाराला चित्ररूप देणारी ही श्याम जोशींची चित्रं ! चित्रकाराच्या मनाच्या आरशात उमटलेलं त्यांचं प्रतिबिंब रंगरेखांच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोचवण्याचं काम ही चित्रं करतात. ह्या साऱ्या चित्रांत एक खास वैशिष्ट्य पाहणाऱ्याला जाणवतं ते म्हणजे त्यांचा सौम्य, शांत, शीतलपणा ! एखाद्या घरंदाज, शालीन, पडदानशीन सौंदर्याचा साज ! ह्यात भावनांचा विलास आहे; पण कल्लोळ नाही, खळखळाट नाही की झगमगाट नाही. आहे ते कविमनाच्या चित्रकाराच्या मुलायम, रेशमी कुंचल्याचं हळुवारपण.

आता हेच चित्र पाहा ना ! 'सी-ग्रीन' रंगानं आख्खा कॅनव्हास भरलेला आणि मध्यभागी फक्त दोन चिमुकले, गोजिरवाणे पक्षी—एक चिमणा, दुसरी चिमणी ! कशी ? चोचीत चोच घालून बसलेली ? नाही ! एकमेकांच्या जवळ पण चोचभराचं अंतर राखून असलेली. आख्खं चित्रच त्या प्रणयी युगुलाला आंदण दिलंय असं वाटणारी. चित्रात बाकी पानं, फुलं, झाडं, पक्षी काही सुद्धा नाही. जसं काही त्यातलं काही आलं तर त्या प्रेमी जीवांच्या निवांतपणाला धक्का पोचेल असं चित्रकाराला वाटलं असावं. कारण ती दोघंही स्वत:तच इतकी हरवून गेली आहेत की त्यांच्या दृष्टीनं बाकीच्या जगाचं अस्तित्वच संपून गेलंय !'

त्यानंतर हे एक अगदीच वेगळा मूड पकडणारं चित्र ! लाइफसाईझपेक्षाही मोठा वाटणारा बेडूक. आता बेडकात कधी कुणी सौंदर्य पाहिलंय ? सौंदर्याचा लवलेशही नसलेला, जगाकडून तुच्छता, हेटाळणी हेच ज्याच्या वाट्याला शतकानुशतके आलेलं, असा हा प्राणी. पण त्यालाही श्याम जोशींचा कुंचला सौंदर्याचा स्पर्श करून देतो. खास करून नजरेत भरते ती ह्या भव्य बेडकाच्या बटबटीत डोळ्यांतील विलक्षण चमक. त्याची एकंदर ढबच अशी रुबाबदार झाली आहे की कुणालाही वाटावं की, आता हा पुढाऱ्याच्या थाटात निसर्गाच्या महानतेबद्दल मानवाला चार शब्द सुनावणार आहे.

ह्यासारखीच इतरही किती तरी चित्रं- विविध रंग, विविध भाव घेऊन आलेली; पण या सर्व चित्रांमध्ये जरासं खटकलं ते तीन घोड्यांचं चित्र. पानं, फुलं, फुलपाखरं, चिमण्या ह्यांच्या नाजूकसाजूक राज्यात हे घोडे जरा जागा चुकल्यासारखे वाटले. कदाचित् चित्रकाराच्या भावूक मनाला ते घोडेही स्वप्नातल्या बेलगाम धावणाऱ्या कल्पनांचं प्रतीक म्हणून नाजूक, सुंदर दिसत असतील.

आणि सरतेशेवटी पाहावं हे मावळतीच्या सूर्यबिंबाचं चित्र ! इथं मावळतीचं अंगप्रत्यंगांनी फुललेलं हे लाल, पिवळ्या आणि काळ्या रंगातलं सौंदर्यही उगवतीइतकंच प्रफुल्लित आहे. त्या सूर्यबिंबाला पक्कं ठाऊक आहे की, ते आता पाण्यात बुडणार आहे. पण तरीही ते हसतंय—आपल्या सौंदर्याचं तेज त्या पाण्यावरच्या नाजूक लाटांना बहाल करून हसतंय आणि त्याचं ते मंद हास्य त्या आख्ख्या चित्रभर फुलून राहिलंय. मातीत मिसळून जाता जाता मातीलाही सुगंधित करून जाणाऱ्या एखाद्या मृत्युंजयी वीरासारखं ते काही तरी गंभीर, मंगल, उदात्त असा संदेश देऊन जातंयसं वाटतं. ह्या चित्रांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात कुठेही माणूस नाही आणि तरीही माणूस जागोजागी डोकावतोय—त्याच्या भावनांच्या रूपानं !

ही आणि अशी बरीच चित्रं २१ ते २८ ऑगस्टपर्यंत मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत रसिकांना दिसणार आहेत—श्याम जोशींच्या चित्रांच्या प्रदर्शनाच्या निमित्तानं !

—सौ. शैलजा नेरूरकर


"अरविंद सेल्स कॉर्पोरेशन"

सर्व प्रकारच्या शास्त्रीय उपकरणांचे उत्पादक. आपल्या महाविद्यालया-साठी व शाळेसाठी उत्कृष्ट उपकरणे पुरवू.

कचेरी : रघुकुल, रामनगर
(डोंबिवली पूर्व)

# एक आल्हाददायक छायाचित्र-प्रदर्शन

नव्या उमेदीची एक नवी संस्था पुण्यात पहिलेच प्रदर्शन भरवत आहे. त्यातील एकाहून एक सरस अशी छायाचित्रे पाहून मनाला आल्हाद तर होतोच, शिवाय या नव्या संस्थेविषयीच्या अपेक्षाही उंचावू लागतात. एक्झिबिशन सोसायटी असे या संस्थेचे नाव असून उत्तमोत्तम छायाचित्रं व चित्रं रसिकांपुढे सादर करण्याची तिची योजना आहे. उत्तमोत्तम कलाकृती चोखंदळ पुणेकरांपुढे आणत असतानाच नवोदित कलावंतांनाही ही संस्था उत्तेजन देणार आहे.

दि. ११ ते १८ ऑगस्ट या मुदतीत एक्झिबिशन सोसायटी अखिल भारतीय छायाचित्रकारांच्या निवडक कलाकृती रंगमंदिराच्या कलादालनात प्रदर्शित करीत आहे. अशा छायाचित्रांची संख्या सुमारे दोनशे होईल. त्यातील काही छायाचित्रे तर रसिकांच्या कायमची स्मरणात राहतील अशी आहेत.


'लेक साईड व्ह्यू' हे अठ्ठयाऐंशी क्रमांकाचे छायाचित्र कोणालाही चटकन आवडेल असे आहे. चांदण्या रात्रीतल्या स्वप्ननगरीची कल्पना आणून देण्याची कामगिरी या छायाचित्राने केली आहे. नावीन्यपूर्ण आकारांच्या वास्तू, भोवताली सुंदर सुंदर झाडे, कडेला चमचमणारे पाणी हे सारं लोभसवाणं आहे. पाण्याची झळाळी आणि इमारतींच्या वरच्या बाजूवर पडणारा प्रकाश रात्रीच्या काळोखात शुभ्र चांदणे जी बहार उडवते त्याचे प्रत्यंतर या छायाचित्रात येते. काही तरी आगळे-वेगळे टिपण्याचे छायाचित्रकाराचे हे कसब कौतुकास्पद आहे. 'फीडिंग टाइम' हे छायाचित्रही असंच चटका लावणारं आहे. भुकेलेलं, आतुरतेनं मातेची वाट पाहणारं पिल्लू आणि वेगाने येऊन त्याच्या चोचीत चोच घालून त्याला भरवणारी पक्षिणी वात्सल्याचं मूर्तिमंत दर्शन घडवते. पक्षिणीचा उडण्याचा वेग, पिल्लाविषयीची आत्यंतिक ओढ आणि वात्सल्य रस इत्यादींचा नेमका क्षण छायाचित्रकाराने पकडला असून परिणामकारकरित्या चित्रित केला आहे.

सदुसष्ट क्रमांकाच्या चित्रात चाफ्याचे काव्यमय झाड व त्याच्या लाजत मुरकत गगनाकडे झेप घेणाऱ्या फांद्या दाखवल्या आहेत, तर 'वुई टू' या छायाचित्रात काळ्या हंसांची जोडी स्वच्छंदपणे विहरत असल्याचे चित्रित केले आहे. एकवीस क्रमांकाच्या चित्रात काड्याकाड्यांचा एक निष्पर्ण वृक्ष, पाण्याकाठच्या दोन होड्या व निर्मनुष्य वातावरण गूढता निर्माण करून आपले लक्ष वेधून घेते. 'द स्ट्रीम' या छायाचित्रात फेसाळणाऱ्या पाण्याचा वळणारा शुभ्र प्रवाह काळसर वातावरणात उठून दिसतो. त्यातील दोन मनुष्याकृती चित्रात मौज भरतात. पाण्याचा वेग, फेस आणि तुषार अत्यंत कलात्मकतेने टिपलेले आहेत. तंत्रकौशल्याने नटलेली काही छायाचित्रे फारच सुरेख आहेत. 'झेनोबिया' हे छायाचित्र पेन्सिलीने व्यक्तिचित्र रेखाटावं तसं वाटतं. शिल्पाचा उठाव, निर्मिति-निर्मितींचा आभास, जिवंतपणा, पोताचा इच्छित परिणाम इत्यादींमुळे छायाचित्र पुनःपुन्हा पहावेसे वाटते. 'मिस्टी मॉर्निंग'मधील धुक्यातील पाणवठा व त्यात म्हैस धुणारा कृष्णछायेसारखा माणूस व अलीकडे लोंबणाऱ्या वडाच्या गर्द फांद्या यामुळे देखणं छायाचित्र तयार झालं आहे. ही व अशीच आणखी किती तरी सुंदर छायाचित्रं या प्रदर्शनात असून ती पाहिल्याशिवाय त्यापासून मिळणारा आनंद अनुभवास येणार नाही.

—अ. दि. कोकड

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# चक्रव्यूह



**चक्रव्यूह भेदण्यात अपयशी ठरलेला अभिमन्यू—बासूदा**

एखाद्या माणसाची प्रवृत्ती अशी असते की, बारश्यापासून बाराव्यापर्यंत कोणत्याही गोष्टीबद्दल तो फक्त मिस्कील विचारच करू शकतो. पाळण्यात मुठी चोखत शांत झोपलेले हसरे बाळ असो वा सरणावर गप्प जळणारा थंड मुडदा—हा गृहस्थ त्याच्याकडे पाहून पहिला विचार करणार—'च्यायला, काय मस्त आरामात पडलाय बेटा!' आता अशी प्रकृती असलेल्या माणसावर भारताला भेट द्यायला आलेल्या माझ्दालँडच्या राष्ट्रपतींचे खुनी हल्ल्यापासून रक्षण करण्याची जबाबदारी आपण आपणहून सोपवणार नाही; पण त्याच माणसाने ती बळेबळे अंगावर ओढून घेतली, तर हतबल होण्यावाचून आपण तरी काय करणार?

'चक्रव्यूह'मध्ये बासू चटर्जींच्या बाबतीत नेमका हाच प्रकार घडला आहे. खरे तर बासूदांनी याआधीच 'दो लडके दोनों कडके' या चित्रपटात असाच लहान मुलगा पळविण्याचा उद्योग अंगावर घेतला अन् मग तो रहस्यमय घोळ निस्तरता निस्तरता त्यांच्या नाकी नऊ आले. आता एवढा अनुभव घेतल्यावर 'हे गाव आपल्याला निभणारे नाही, सबब तिकडे जाणारी ही वाट आपली नव्हे,' हे लक्षात घेऊन रहस्यमय चित्रपटाचा प्रांत एखाद्या विजय आनंद वा अविकामच्या (अरुणा-विकास) ताब्यात देऊन आपल्या 'हलकाफुलफुलीत' या प्रांतावर नीट अधिराज्य गाजवायचे; पण नाही. 'दो लडके'चा नवीन उपक्रम स्तुत्य, सुधारणेस वाव असे गृहीत धरून आणि 'दो लडके'ने प्रेक्षकांचे तोंड आधीच पोळले असतानाही त्यांनी 'चक्रव्यूह' हे त्याहीपेक्षा कढत रसा-

यन प्रेक्षकांनी घशाखाली उतरवावे, अशी भोळीभाबडी अपेक्षा ठेवली आहे.

माझ्दालॅंडचे राष्ट्राध्यक्ष भारताला भेट देण्यासाठी आले असताना त्यांचा खून करण्याचा कट काही परकीय हस्तक (म्हणजे प्रदीपकुमार, पिंचू कपूर, युनुस परवेज वगैरे मंडळी) रचतात. त्याचा सुगावा आनंद (विनोद मेहरा) या पत्रकार कम आपल्या देशाच्या गुप्तहेराला लागतो; पण त्याचा खून झाल्यामुळे ह्या कटाची बित्तंबातमी दिल्लीला जाऊन आय्. जी. पी. साहेबांना कळविण्याची जबाबदारी अमित नारायण (राजेश खन्ना) या तरुणावर येते. तो दिल्लीला जाण्यासाठी निघतो; तेव्हा आनंदच्या खुनाचा संशयित म्हणून पोलीस त्याच्यामागे लागतात, शिवाय तो परदेशी हस्तकांचा गुंड ससेमिरा त्याच्या पाठलागावर असतोच. शेवटी अनेक योगायोग आणि हास्यास्पद प्रसंगमालिकेनंतर अमित दिल्लीला पोहोचतो आणि माझ्दालॅंडचे अध्यक्ष सुटकेचा निःश्वास टाकतात.

पत्रकार आनंदने आपल्या आत्महत्येची बतावणी करणे आणि त्याचा प्रत्यक्षात झालेला खून या दोन घटना वगळता बाकी चित्रपटात त्याच्या 'चक्रव्यूह' नावाला साजेशी गुंतागुंत, अपेक्षित रहस्य, वेग, thrill औषधापुरतेही नाही. आहे तो फक्त अमितचा पोलिस व परदेशी हस्तक दोघांनी केलेला पोरकट शिवणापाणी, पाठलाग आणि त्यातून वाचण्यासाठी अमितने केलेले त्यातून पोरकट उपद्व्याप. चित्रपट पाहताना सतत 'The Day of the Jackal' ची आठवण येत होती, त्यातील तो खिळवून ठेवणारा वेगवान पाठलाग याद येत होता. तसा वेग, तशी वेधकता, तशी गुंतागुंत या 'चक्रव्यूह'-मध्ये कुठेच नाही. पडद्यावर सतत पळापळ दाखवणे वा चित्रे सतत हलती ठेवणे म्हणजे वेगवानपणा असा बासूदांचा समज असेल तर तो चुकीचा आहे.

रहस्यमयतेच्या बाबतीत असे वाळवंट असताना तोंडावर काही गार शितोडे उडतात ते काही हसत–खेळत प्रसंगांना मिळालेल्या हातखंडा बासूशैलीमुळे. सुरुवातीलाच सतत अमित आणि छाया (नीतू सिंग) यांची होत गेलेली चुकामूक, दिल्लीच्या वाटेवर अमितवर ओढवलेले प्रसंग आणि भेटलेल्या व्यक्ती (उदा० एक चलाख वैदू, अमितला नेता समजून त्याचे स्वागत करणारे ग्रामसिंह, एक रात्र आश्रयाला आलेल्या या 'परदेसी' वर डोळा ठेवून म्हाताऱ्या नवऱ्याला अलगद शेतराखणीला पाठवणारी तरुण शेतकरीण, शेवटी दाखवलेला सरकारी लाल फितीचा गोंधळ तर केवळ लाजवाब आहे.) असे हाताच्या बोटावर मोजण्याइतकी ठिकाणे सांगता येतील; पण केवळ एवढ्याच आठ–दहा तुषारांसाठी बाकीचा कोरडा ठणठणीत रखरखीतपणा प्रेक्षकाने सहन करायचा का? काही ठिकाणी तर बासूदांनी विनोदसुद्धा पीळ दर्जाचे मारले आहेत. अमितचे अनुक्रमे दूधवाला, रेल्वेकॅंटिनचा वेटर आणि मोटर-सायकल चालवणारा, 'मौतका कुआँ' वाला अशी होणारी वेषांतरे म्हणजे अशा ह्या दर्जाच्या विनोदाची उदाहरणे. नुसताच पीळ, त्यात विनोदसुद्धा नाही असेही प्रसंग भरपूर आहेत. विशेषतः छायाचे बाबा (ओम शिवपुरी) आणि छोटी बहीण या दोघांनी अमितची केलेली थट्टा हे अशा केवळ पिळाचे ठळक उदाहरण. योगायोगांचा आधार घेताना मात्र बासूदांनी (नायकाला शेवटी थोडे झुकते माप दिले असले तरी बाकी चित्रपटभर) नायक व खलनायकांना समान वजनाने तोलले आहे. पाठलागामध्ये नायकाला पकडणे हा प्रकार योगायोगाने होतो आणि सुटकाही तशाच महान योगायोगाने होते. कोणी तरी असा मुद्दा मांडला होता की, तथाकथित रहस्यकथा या प्रकाराचे 'चक्रव्यूह' मध्ये बासूदांनी विडंबन केले आहे; पण किरकोळ प्रसंगांमधून काही गोष्टींना काढलेले नैमित्तिक बोचकारे वगळता संपूर्ण चित्रपट विडंबन म्हणून बासूदांनी हाताळला आहे, असे मला वाटले नाही.

चित्रपटात प्रमुख कलाकारांना निरनिराळ्या पोषाखांमध्ये पळण्याव्यतिरिक्त काहीच काम नाही. चित्रपटात भाव खाऊन जातात त्या औषधविक्या वैदू, पोलीस हवालदार (विजू खोटे); आय्. जी. पी.च्या कचेरीतील कारकून अशा छोट्या छोट्या भूमिका.

चित्रपटात दृश्य आणि ध्वनी यांचे झगडेही पुष्कळ आहेत; त्यामुळे पात्राचा नेमका पाय उचललेला असतानाच आपल्याला पावलांचे आवाज ऐकू येतात. (कदाचित हाही बासूदांच्या डोक्यातील काही रहस्यमय प्रकार असावा) किंवा आधी बेल वाजते आणि मग ती वाजवण्यासाठी माणसाचा हात बटणाच्या दिशेला जातो. (हल्ली बहुधा प्रकाश आणि ध्वनी यांनी आपल्या वेगांची अदलाबदल केली असावी.)

एकूणच आपला पूर्ण कब्जा नसलेल्या रहस्यमय चित्रपट नावाच्या या चक्रव्यूहात बासूदांचा अखेर अभिमन्यू झाला! ☐

# चित्रपटाबाहेर

बर्नार्ड शॉच्या 'पिग्मॅलियन'ने जगातल्या सिने–नाट्यक्षेत्रातील बड्या बड्या कलावंतांना मोहित केलं आहे. ऑड्री हेप्बर्न आणि रेक्स हॅरिसन यांचा 'My Fair Lady' हा या नाटकावरील अतिशय गाजलेला सिनेमा. नुकताच हा सिनेमा पुण्यातील अलका टॉकीजमध्ये येऊन गेला आणि पाचवा–सहावा रन असूनदेखील शेवटच्या खेळापर्यंत हाउसफुल झाला.

आता हिंदी चित्रपटसृष्टीतील हलके-फुलके चित्रपट देण्यात आघाडीवर असलेल्या बासू चटर्जींनी या नाटकाला हात घातला आहे. 'पिग्मॅलियन' हिंदी चित्रपटाच्या माध्यमातून हाताळताना बासुदांनी त्याचं नामकरण 'मनपसंद' असं केलंय, तर प्रो. हिजिन्स एका महेंद्रप्रताप नावाच्या माजी संस्थानिकाच्या रूपात, कर्नल पिकेरिंग डॉ. काशिनाथ मिश्रा या नावाने आणि शॉची एलायझा कमली या काठेवाडी मुलीच्या वेषात पडद्यावर येणार आहे. 'मनपसंद'ची पटकथा बासुदांचीच आहे. त्यामुळे वातावरणातील बदलानुसार व्यक्तिरेखा आणि कथेतही त्यांनी काही बदल केले आहेत. राजे महेंद्रप्रताप हे 'मनपसंद'मध्ये भाषातज्ज्ञ नाहीत, आवाज आणि संगीतामधील ते दर्दी आहेत. डॉ. काशिनाथ मिश्रा हेही संगीततज्ज्ञ आहेत आणि अमेरिकेतील एका विद्यापीठातून ते भारताला भेट देण्यासाठी आले आहेत. हे दोघेजण एका मेजवानीच्या प्रसंगी भेटतात आणि एकमेकांचे मित्र होतात. एकदा लोकलमधून दोघेजण जात असताना दात घासण्याच्या काड्या (दातून) विकणारी कमली त्यांना दिसते आणि या 'दातूनवाली'ला आघाडीची गायिका करण्याचं आव्हान राजे महेंद्रप्रताप स्वीकारतात. जर ते यशस्वी झाले तर डॉ. मिश्रा यांनी कमलीशी लग्न केले पाहिजे, कारण ते स्वतःही संगीततज्ज्ञ आहेत, असं ठरतं. त्याप्रमाणे कमलीला संगीतात प्रवीण केलं जातं; पण ते करत असताना राजेसाहेब

स्वतःच तिच्या प्रेमात पडतात. My Fair... प्रमाणे ' मनपसंद 'मध्ये कमलीच्या बोलण्या-वागण्यात घडून येणाऱ्या बदलांना फारसं महत्त्व दिलेलं नाही, तर तिच्या संगीत–साधनेवर आणि साऱ्या जगाला मोहिनी घालणाऱ्या आवाजावर बासुदांनी भर दिला आहे.

हिंदी चित्रपटसृष्टीतील चॉकलेट हिरो देव आनंद राजे महेंद्रप्रतापच्या भूमिकेत पडद्यावर येणार असून डॉ. काशिनाथ मिश्राचा रोल गिरीश कर्नाड करत आहे. ' स्वामी 'नंतर बासुदांबरोबर गिरीश आणखी तीन चित्रपटांमध्ये काम करतोय. ' मनपसंद ' हा त्यापैकी एक. देव आनंदचं नवं 'फाइन्ड' टीना मुनीम कमली म्हणून पडद्यावर दिसणार आहे. स्वतः बासुदा टीनाच्या कामावर बेहद्द खूष आहेत. प्रसिद्ध विनोदी नट मेहमूद कमलीच्या बापाची भूमिका करणार आहे, आणि ' पिग्मॅलिअन 'मधील पिअर्सबाईचं काम लीला मिश्रा सांभाळणार आहे.

या चित्रपटाचं जवळजवळ तीनचतुर्थांश काम पूर्ण झालं असून ' Basu just can't miss with ' Man Pasand'; it's a sure fire hit, ' अशी ग्वाही स्वतः देव आनंदनेच देऊन ठेवलीय.

□

हिंदी चित्रपटसृष्टीतील बहुतेक बड्या मंडळींनी आपली निवृत्तीनंतरची सोय आत्ताच करून ठेवलेली आहे. गब्बरसिंग अमजादचं बंगलोरला पंचतारांकित हॉटेल आहे आणि मुंबईमध्ये एक थिएटर आहे. दिल्लीचं प्लाझा टॉकीज आणि मुंबईचं ' मिनर्व्हा ' शम्मी कपूरच्या मालकीचं आहे राजेश खन्नानं मुंबईत एक अलिशान हॉटेल आणि एक चित्रपट वितरण संस्था आणि बंगलोरमध्ये एक थिएटर एवढी सोय आत्ताच लावून ठेवलीय. राज कपूरचा पुण्याजवळील ' राज–बाग 'ला ' सत्यं, शिवम्...' नंतर तर एखाद्या तीर्थक्षेत्राचंच (For Zeenat-fans Only) स्वरूप आलंय. निर्मितीच्या बाबतीत जरी राजकपूरशी स्पर्धा करणं शक्य नसलं तरी नवीन निश्चलनेही फरियाबादला एका मोठ्या फार्मवर पैसे घातले आहेतच. पोरा–बाळांची लग्नंही पार पाडलेला राजेंद्रकुमार एक कापडगिरणी आणि एक दारूचा कारखाना थाटून सुखात आहे, तर ' मुझे (भी) जीने दो ' वाल्या सुनील दत्तने एका दारूच्या कारखान्याचे शेअर्स घेतले आहेत आणि एक ' डबिंग थिएटर 'चाही तो मालक आहे. थोडक्यात, रुपेरी पडद्यावर अगदीच बुद्दू वाटणारे आपले ' तारे ' प्रत्यक्ष व्यवहारात तरी हिशेबाने वागताना दिसतात.

□

चित्रपटामध्ये बड्या बड्या कलाकारांच्या भाऊगर्दीबरोबरच आणखीही काही गोष्टींची आवश्यकता असते हे ' हिरालाल–पन्नालाल'च्या अपयशानंतर हिंदी चित्रपट-निर्मात्यांनी आता ओळखलेलं दिसतंय. म्हणूनच ' जबरदस्त ' या आपल्या चित्रपटावर काही लाख खर्चून झाल्यावर नासीर हुसेनने तो रद्द केलाय आणि आता अर्धा पटकथासंवाद लिहून मगच शूटिंगला सुरुवात करायचा त्याने निश्चय केला आहे.

□

' जान ' या शब्दाने सुरू होणाऱ्या चित्रपटांचं नशीब काही सध्या चांगलं दिसत नाही. ' जानेमन ' आणि ' जानी दुष्मन 'ला सेन्सॉरची कात्री लागली, तर ' जाने बहार ' आणि ' जान जिगर ' हे चित्रपट नट–नट्याच आजारी पडल्यामुळे खोळंबले आहेत आणि आता ' जानदार'ला पैसा पुरवणाऱ्या फायनान्सरने एकदम ' प्रवाह ' बंद केल्यामुळे तोही चित्रपट संकटात आला आहे.

□

सचिन या फडतुस चित्रपट निर्मात्याने आतापर्यंत पन्नास चित्रपट काढले आहेत, हे कोणाला सांगूनही खरं वाटणार नाही ' और कौन ' हा त्याचा पन्नासावा चित्रपट. आता पुढला चित्रपट काढण्यापूर्वी सचिन-देवांनी आपली हेअर स्टाइल आणि आवाज जरा बदलला तर बरं होईल !

□

अमिताभ-रेखा प्रकरण आता निवळू लागल्याच्या वार्ता फिल्म इंडस्ट्रीत पसरत आहेत. त्यामुळे बऱ्याच जणांचे जीव भांड्यात पडले आहेत. अर्थात आज-काल हिंदी चित्रपट-सृष्टीत नट-नट्यांपेक्षा त्यांच्या आयाच महत्त्वाचे ' रोल ' बजावत असतात. (आठवा–हेमा, नीतू, रीना .... ) अमिताभच्या-बाबतीतही तेच घडतंय. अमिताभ मोकळ्या वेळात जयापेक्षाही माँजीकेपास ज्यादा रहता है। आणि यामुळेच रेखा त्याच्यापासून दूर चालली आहे. स्त्रीच स्त्रीच्या मार्गातील धोंड ठरते ती अशी !

□

कुठल्याही मेजवानीत एकमेकांची चुंबनं घेणं हे फिल्म इंडस्ट्रीत आता एक कर्मकांडच होऊन बसलं आहे. धर्मेंद्र प्रेमनाथचं, राज-कपूर राजेंद्रकुमारचं, नीतू रेखाचं, राजेश शत्रुघ्नचं, तर आशा सचदेव शबानाचं नेहमी अगदी प्रेमभरानं चुंबन घेतात; पण परवीन आणि झीनत मात्र वेटर्स वगळता कोणालाही सोडत नाहीत अशी हल्ली तक्रार ऐकू येऊ लागली आहे.

□

' तृप्ती ' या प्रयाग राज दिग्दर्शक असलेल्या चित्रपटात शबाना आझमी आणि स्मिता पाटील अशा दोन बड्या नट्या समोरासमोर येत आहेत. त्यांची जुगलबंदी निश्चितच रंगणार आहे. कारण शबाना अगदी धंदेवाईक नटी झाल्याबद्दल स्मिता तिचा तिरस्कार करते, तर स्मिताच्या ॲक्टिंगमध्ये फारसा काहीच दम नसल्याचा शबानाचा दावा आहे. आता घोडा-मैदान जवळच आहे. □




भारत भाग्य विधाता
१५ ऑगस्ट १९४७ रोजीं, आम्ही भारतीय लोक खऱ्या अर्थानें भारताचे भाग्य विधाता झालो. आमच्या स्वातंत्र्याचा ३२ वां वर्धापन दिन आम्हाला आवाहन करीत आहे कीं;
★ आमच्या कामगिरीपासून आम्हीं शक्ति आणि स्फुर्ति घ्यावी, आणि
★ उज्ज्वल भविष्यासाठीं आम्ही अधिक तत्परतेने काम करावे.
स्वातंत्र्याच्या गेल्या ३२ वर्षात....
★ आमच्या देशाच्या अखंडतेवर झालेले सर्व बाह्य हल्ले आम्ही यशस्वीपणें परतवून लाविले आहेत.
★ सरासरी आयुष्यमान ३२ पासून ५२ पर्यंत वाढले आहे.
★ आमचे अन्नधान्य उत्पादन दुप्पटीपेक्षा अधिक झाले आहे.
★ आमचे औद्योगिक उत्पादन चौपटपेक्षा अधिक वाढले आहे.
★ आमचा परकीय चलनाचा सांठा रु. ५००० कोटिंच्या पलिकडे गेला आहे.
चालू पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात नमूद केल्याप्रमाणे "आमची गति-मंद आणि परावलंबी अर्थव्यवस्था आतां आधुनिक आणि अधिक स्वावलंबी करण्यात आली आहे व याबद्दल आम्ही सार्थ राष्ट्रीय अभिमान बाळगला पाहिजे."
आपल्या कामगिरीबद्दल आपण सार्थ अभिमान बाळगू या.
स्वातंत्र्य आणि समृद्धिसाठीं आपण संघटित राहू या.
davp 79/139